
# सार्वजनीन धर्म

## स्वरूप व साधना

ग्रं. सं. ठाणें
निबंध
९८७५




REFBK-0012320

स्वामी विवेकानंद

श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर

निबंध
२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३३०९५ वि: निबंध
क्रमांक ११७१ नों दि: १४.११.८२

# सार्वजनीन धर्म

## : स्वरूप व साधना :

स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23075 दि: 10/2/75
क्रमांक 2810 नों. दि: 24/11/62.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
12320

REFBK-0012320

श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर

प्रकाशक
स्वामी भास्करेश्वरानंद,
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर-१

अनुवादक
प्रा. ल. के. आरावकर, एम्. ए.
मुंबई

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ४१ वें
( सर्व अधिकार श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सुरक्षित )

मूल्य १.००

मुद्रक
श्री. डी. पी. देशमुख,
बजरंग मुद्रणालय,
कर्नलबाग, नागपूर-२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३३९१५ वि: निबंध.
क्रमांक १४१९ नों दि: १४-११-६२.

# प्रास्ताविक

स्वामी विवेकानंदकृत 'सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना' हें आमचें नवीन प्रकाशन प्रसिद्ध करतांना आम्हांला आनंद होत आहे. स्वामी विवेकानंदांनी सार्वजनीन धर्मावर दिलेल्या मूळ इंग्रजी व्याख्यानांचा हा अनुवाद आहे. सार्वजनीन धर्माचें यथार्थ स्वरूप जाणून घेणें आज अत्यंत आवश्यक होऊन बसलें आहे, कारण हें स्वरूप जाणून घेतल्यानेच जगांतील धर्मविषयक कलह दूर होऊं शकतील. विभिन्न धर्मांचा परस्परासंबंधी जो गैरसमज आहे तो सार्वजनीन धर्माच्या यथार्थ ज्ञानानेच नाहीसा होईल. या दृष्टीने स्वामी विवेकानंदांनी प्रस्तुत पुस्तकांत सार्वजनीन धर्माचें जें स्वरूप वर्णिलें आहे व तो प्रत्यक्ष आचरणांत आणण्याचा जो मार्ग दाखविला आहे तो विचारणीय असून जागतिक ऐक्य व शांति स्थापित करण्यासाठी त्यापासून महत्त्वाचें मार्गदर्शन लाभेल.

प्रा. ल. के. आरावकर, एम्. ए., मुंबई, यांनी हा अनुवाद करून दिला याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

दि. १५-९-१९६२ —प्रकाशक

# अनुक्रमणिका

१. सार्वजनीन धर्म ... ... १

२. सार्वजनीन धर्म प्रत्यक्षांत आणण्याचा मार्ग ... ३६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३३८१५ वि: निबंध
क्रमांक २४१८ नों. दि. २४-११-६२.



स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३३ ९७५ वि: ...
...क ... नों दि: २८-११-६२
...


# सार्वजनीन धर्म

## विविध मनोवृत्ति व विविध उपासनापद्धति यांचा समावेश सार्वजनीन धर्मांत कसा होईल ?

आपल्या इंद्रियांचें जेवढें म्हणून क्षेत्र आहे किंवा आपलें मन ज्या गोष्टींची कल्पना करूं शकतें त्या सर्व क्षेत्रांत व गोष्टींत दोन शक्तींच्या क्रिया-प्रतिक्रिया चालू असलेल्या आपल्याला आढळून येतात. ह्या दोन शक्ति परस्परांना विरोध करीत असतात आणि त्यामधून, बाह्य जगतांत आपल्याला सतत दिसणाऱ्या आणि अंतर्जगतांत आपल्या सतत अनुभवास येणाऱ्या सगळ्या संमिश्र स्वरूपाच्या घटना निर्माण होत असतात. बाह्य जगतामधे या विरोधी शक्तींचें कार्य आकर्षण व अपसारण या स्वरूपांत व्यक्त होत असतें. केंद्रगामी (Centripetal) आणि केंद्रत्यागी (Centrifugal) शक्ति अशीं दुसरीं नांवें त्यांना देतां येतील. याच दोन्ही शक्ति आपल्या अंतर्जगतांत प्रेम व द्वेष किंवा शुभ व अशुभ अशा स्वरूपांत व्यक्त होत असतात. कांही वस्तु आपण आपल्यापासून दूर ढकलीत असतों, तर कांही वस्तु आपण आपल्याकडे ओढून घेत असतों. आपण कांही वस्तूंकडे आकर्षिले जातों, तर कांही वस्तूंपासून आपल्याला दूर जावेंसें वाटतें. आपल्या जीवनांत अनेक वेळां आपल्याला असें आढळून येतें की कांही व्यक्तींबद्दल जणु कांही अकारण आकर्षण आपल्याला वाटतें. त्याचप्रमाणे कित्येक वेळां दुसऱ्या कांही व्यक्तींबद्दल आपल्याला अकारण तिटकारा वाटतो. ही गोष्ट सर्वांच्या नित्य परिचयाची आहे. आणि या

शक्तींचें कार्यक्षेत्र जितकें उच्च असेल तितका या विरोधी शक्तींचा परिणाम तीव्र व डोळयांत भरण्यासारखा असतो. मानवी जीवनाचें व विचाराचें सर्वोच्च क्षेत्र धर्म हेंच होय. आणि या ठिकाणींच ह्या दोन शक्तींचें कार्य अत्यंत स्पष्टपणें दिसून येतें. मानवाला ज्ञात असलेलें पराकाष्ठेचें प्रेम धर्मांतून उद्‌भवलेलें आहे. त्याचप्रमाणे मानवाला माहीत असलेला अति आसुरी द्वेषहि धर्मांतूनच उत्पन्न झालेला आहे. जगाने ऐकलेले शांति देणारे सर्वोत्कृष्ट शब्द धर्माच्या राज्यांतील थोर पुरुषांच्या मुखांतून बाहेर पडलेले आहेत. त्याप्रमाणे जगाला ठाऊक असलेली अत्यंत कटु निंदा-नालस्तीहि धर्माच्या राज्यांतील लोकांच्या तोंडून निघालेली आहे. धर्माचें उद्दिष्ट जितकें अधिक श्रेष्ठ, त्याची संघटना जितकी अधिक व्यवस्थित, तितकें त्याचें कार्य अधिक नजरेंत भरण्यासारखें असतें. धर्माच्या प्रेरणेमुळे या जगांत जितके रक्ताचे पाट वाहिले आहेत तितके मानवाच्या दुसऱ्या कोणत्याहि प्रेरणेमुळे वाहिलेले नाहीत. याबरोबरच धर्माने जितकीं रुग्णालयें व गरिबांसाठी जितकीं आश्रयस्थानें निर्माण केलीं आहेत तितकीं दुसऱ्या कुणीं निर्माण केलीं नाहीत. मानव-जातीचीच नव्हे, तर अत्यंत कनिष्ठ पशूंचीहि काळजी वाहण्याची वृत्ति धर्मामधूनच निर्माण झालेली आहे, दुसऱ्या कशामधून नाहीं. धर्माने मनुष्य जितका निष्ठुर बनतो तितका दुसऱ्या कशानेहि नाही; आणि धर्माने मनुष्य जितका कोमल बनतो तितका दुसऱ्या कशानेहि नाही. ही गोष्ट भूतकालापासून चालत आलेली आहे आणि भविष्यकालांतहि प्रायः ती तशीच चालूं राहील. तरी पण धर्मांधर्मांमधील, पंथापंथांमधील संघर्षांतून निर्माण झालेल्या कोलाहल, कलह, ईर्ष्या, द्वेष या सर्वांमधून केळोवेळीं अशी

वज्रगंभीर वाणी निघाली आहे की जिने हा सर्व कोलाहल बुडवून टाकून शांतीची व समन्वयाची घोषणा केली आहे. समग्र जगताने ही घोषणा ऐकली आहे. हा समन्वय व ही शांति कधी प्रस्थापित होतील काय?

महान् संघर्ष असलेल्या ह्या धर्माच्या क्षेत्रांत अखंड समन्वय स्थापन होणें कधी शक्य आहे काय? या शतकाच्या उत्तरार्धांत समन्वयाच्या या प्रश्नाचा जग फार गंभीरपणें विचार करीत आहे. विचारवंत माणसें सामाजिक जीवनांत हा समन्वय आणण्यासाठी निरनिराळ्या योजना सुचवीत आहेत आणि त्या प्रत्यक्षांत आणण्यासाठी अनेक प्रयत्न सुरू आहेत. परंतु ही गोष्ट किती कठीण आहे हें आपल्याला माहीत आहे. जीवनकलहाची तीव्रता कमी करणें, मानवाच्या मनावरील भयंकर ताण कमी करणें हें जवळजवळ अशक्य आहे असें लोकांना आढळून येतें. मानवी जीवनाचें जें बाह्य आधिभौतिक क्षेत्र आहे त्यांत शांति व समन्वय स्थापन करणें जर इतकें कठीण आहे तर मानवाच्या अंतर्जगतांत--आध्यात्मिक जगतांत--शांति व समन्वय प्रस्थापित करणें हजारोपट कठीण आहे यांत शंका नाही. शाब्दिक जंजाळांतून थोडा वेळ आपण बाहेर पडावें असें माझें आपणांस सांगणें आहे. आपल्या अगदी लहानपणापासून आपण प्रेम, शांति, उदारता, समता व विश्वबंधुत्व या गोष्टी ऐकत आलों आहोंत. पण केवळ शब्दांव्यतिरिक्त त्यांना कांही अर्थ उरलेला नसून आपण नुसती पोपटपंची चालविलेली आहे; आणि असें करणें हा आपला स्वभावच बनून गेला आहे. तसें केल्याशिवाय आपल्याला राहवत नाही. ज्या महापुरुषांनी आपल्या हृदयांत या उदात्त भाव-भावना प्रथम अनुभवल्या त्यांनी त्या व्यक्त करण्यासाठी हे

शब्द वापरले, आणि त्या काळीं अनेकांना त्यांचा अर्थहि समजला. कालान्तराने अज्ञ जनांनी हे शब्द घेऊन त्यांचा खेळ करण्यास सुरुवात केली आणि धर्माला केवळ शाब्दिक कसरतीचें रूप दिलें. धर्म ही प्रत्यक्ष आचरणांत आणण्याची गोष्ट राहिली नाही. अशा रीतीने धर्माला 'घराण्याचा धर्म', 'जातीचा धर्म', 'देशाचा धर्म' अशासारखें स्वरूप आलें. देशाभिमानाचा तो एक अंग बनला, आणि देशाभिमान हा कांही झालें तरी एकांगीच असतो. सर्व धर्मांमधे समन्वय प्रस्थापित करणें ही गोष्ट नेहमीच कठीण असते. असें असलें तरी या धर्मसमन्वयाच्या प्रश्नाचा आपण विचार करूं या.

प्रत्येक धर्माचे--प्रसिद्ध व थोर अशा प्रत्येक धर्माचे तीन विभाग आहेत असें आपल्याला आढळून येतें. पहिला विभाग म्हणजे तत्त्वज्ञान हा होय. त्यामधे त्या धर्माची सर्व व्याप्ति, मूलभूत तत्त्वें, अंतिम ध्येय व तें साध्य करण्याचीं साधनें सांगितलेलीं असतात. धर्माचा दुसरा विभाग म्हणजे पुराणांचा होय. पुराणांमधे तत्त्वज्ञानाला उदाहरणांच्या साहाय्याने मूर्त स्वरूप दिलेलें असतें. पुराणांत मानवी किंवा अतिमानवी विभूतींच्या चरित्रपर आख्यानांचा समावेश होतो. तत्त्वज्ञानांतील सूक्ष्म व अमूर्त तत्त्वें मानवी अथवा अतिमानवी विभूतींच्या बव्हंशीं काल्पनिक असलेल्या कथांच्या साहाय्याने पुराणांमधे समजावून सांगितलेलीं असतात. धर्माचा तिसरा विभाग हा कर्मकांडाचा वा विधि-अनुष्ठानांचा असतो. हा धर्माचा सर्वांत स्थूल स्वरूपाचा विभाग होय. याच्यांत अनुष्ठानें, विधि, विभिन्न प्रकारच्या क्रिया, फुलें, धूपदीप वगैरे इंद्रियग्राह्य वस्तूंचा समावेश होतो. या सर्व गोष्टी मिळूनच कर्मकांड बनलेलें असतें.

सर्व विख्यात धर्मांचे हे तीन विभाग आहेत असें आपल्याला सहज दिसून येतें. कांही धर्म यांपैकी एका विभागावर विशेष भर देतात, तर दुसरे कांही दुसऱ्या विभागावर अधिक जोर देतात, एवढेंच. धर्माचें प्रथम अंग जें तत्त्वज्ञान त्याचा आपण प्रथम विचार करूं. जगांतील सर्वचजणांना लागू पडेल व मान्य होईल असें, म्हणजेच सार्वजनीन असें एखादें तत्त्वज्ञान अस्तित्वांत आहे काय ? निदान अजून तरी नाही. प्रत्येक धर्म आपलें स्वतःचें असें तत्त्वज्ञान पुढे मांडतो आणि फक्त तींच तत्त्वें सत्य आहेत असा आग्रह धरतो. इतकेंच नव्हे, तर, जो मनुष्य हीं तत्त्वें मानीत नाही तो भयंकर नरकांत जातो अशी त्याची समजूत असते. आपला ज्या तत्त्वांवर विश्वास आहे त्यांच्यावरच दुसऱ्यांनी विश्वास ठेवायला पाहिजे अशी सक्ती करतांना तरवारीचा उपयोग करायलाहि कित्येकजण मागेपुढे पाहत नाहीत. दुष्ट मनोवृत्ति हें त्याचें कारण नव्हे, तर मानवी मनाला जडलेली एक विशिष्ट विकृति हींच त्याचें कारण असतें. आणि तिचेंच नांव 'धर्मवेडेपणा' हें आहे. हे धर्मवेडे लोक फार फार प्रामाणिक असतात, इतरांहून ते फारच प्रामाणिक असतात. पण जगांतील दुसऱ्या वेड्यांप्रमाणेच हे धर्मवेडे लोक अत्यंत बेजबाबदार असतात. जगांतील सर्व रोगांमधे हा धर्मवेडेपणाचा रोग महाभयंकर आहे. मानवी स्वभावांतील सर्व दुष्ट प्रवृत्ति त्याच्यामुळे जागृत होतात. त्याच्यामुळे राग अनावर होतो, वृत्ति क्षुब्ध होतात आणि माणूस हा पशूसारखा होऊन जातो.

विभिन्न धर्मांतील पुराणांच्या बाबतींत सारखेपणा आहे काय ? त्या सर्वांमधे एकवाक्यता आहे काय ? सर्व धर्मांना मान्य असें सार्वजनीन पुराण आहे काय ? निश्चितच नाही.

सर्व धर्मांचीं स्वतंत्र पुराणें आहेत आणि प्रत्येक धर्म हेंच सांगतो की आपल्याच पुराणांतील कथा कपोलकल्पित नसून सत्य आहेत. प्रत्यक्ष उदाहरण घेऊन ही गोष्ट समजावून घेण्याचा आपण प्रयत्न करूं या. केवळ उदाहरण देणें हा माझा या ठिकाणीं हेतु आहे, कोणत्याहि धर्मावर टीका करावी असा माझा उद्देश नाही. ख्रिस्ती माणसाचा असा विश्वास असतो की परमेश्वराने कपोताचें रूप घेतलें व तो या पृथ्वीवर अवतीर्ण झाला. त्याला हें ऐतिहासिक सत्य वाटतें, पौराणिक कथा नव्हे. हिंदु माणसाला वाटतें की गायीचें रूप घेऊन ईश्वर प्रकट झालेला आहे. पण ख्रिस्ती लोकांच्या मताप्रमाणे ही शुद्ध पौराणिक कथा आहे, इतिहास नव्हे. त्यांच्या मतें असली समजूत म्हणजे एकप्रकारची खुळी समजूत आहे. दोन्ही बाजूला देवदूत असलेली पेटीच्या आकाराची प्रतिमा असेल तरच ती प्रार्थनामंदिराच्या गाभाऱ्यांत ठेवण्यालायक आहे असें यहुदी लोक मानतात. त्यांना वाटतें की जिहोवाच्या दृष्टीने अशी प्रतिमा पवित्र असते. परंतु जर ही प्रतिमा सुंदर स्त्री-पुरुषाच्या आकाराची असेल तर ती एक भयंकर मूर्ति आहे, ती फोडून टाका असें ते म्हणतात. अशी आहे आमची पुराणांच्या बाबतींत एकी ! एखाद्या धर्माचा अनुयायी जर जाहीरपणें असें सांगूं लागला की, आमच्या प्रेषिताने अमुक प्रकारची आश्चर्यकारक गोष्ट केली, तर लगेच इतर धर्माचे अनुयायी म्हणूं लागतात की हा धर्मभोळेपणा आहे, ही खुळचट समजूत आहे. परंतु त्याच क्षणीं, आपल्या प्रेषिताने त्याहिपेक्षा अधिक आश्चर्यकारक गोष्टी केल्या हें सांगतांना त्या मात्र ऐतिहासिक स्वरूपाच्या आहेत अशी त्यांची भावना असते. ह्या लोकांच्या डोक्यामधे इतिहास व पुराण यांत जो कांही

सूक्ष्म भेद वसत आहे तो, माझ्या माहितीप्रमाणे, या जगांत अजून कुणीहि समजूं शकला नाही. अशा प्रकारच्या सर्व कथा, मग त्या कोणत्याहि धर्मांतील असोत, पौराणिक स्वरूपाच्याच आहेत. फार तर क्वचित् प्रसंगीं त्यांमधे थोडेसें ऐतिहासिक सत्य असूं शकेल, एवढेंच.

आता प्रश्न येतो विधींचा व अनुष्ठानांचा. प्रत्येक धर्मपंथाचे स्वतंत्र असें कर्मकांड असतें. आणि त्या पंथांतील लोकांना असें वाटतें की आपलींच अनुष्ठानें तेवढीं पवित्र स्वरूपाचीं आहेत व इतरांचीं अनुष्ठानें म्हणजे केवळ खुळचट समजुती होत. जर एखादा धर्मपंथ एखाद्या विशिष्ट प्रतीकाची पूजा करूं लागला, तर दुसरा पंथ "काय भयंकर गोष्ट आहे" अशी ओरड करतो. एका सर्वसामान्य प्रतीकाचें आपण उदाहरण घेऊं. लिंगोपासनें-तील लिंगप्रतिमा हें वास्तविक लैंगिक स्वरूपाचें प्रतीक आहे. परंतु त्याचें हें स्वरूप आज राहिलेलें नाही. आज तें जगत्-स्रष्टया ईश्वराचें प्रतीक म्हणून मानलें जातें. ज्या देशांतील लोक हें प्रतीक मानतात, ते त्याकडे लैंगिक दृष्टीने कधीच बघत नाहीत. अन्य प्रतीकांसारखें तें केवळ एक प्रतीक आहे एवढेंच ते समजतात. परंतु दुसऱ्या धर्माचा वा वंशाचा मनुष्य त्याकडे लैंगिक दृष्टीने पाहतो व त्याचा धिक्कार करतो. पण त्याच वेळीं तो स्वतः असें कांहीतरी करीत असतो की जें या लिंगोपास-कांच्या दृष्टीने अत्यंत भयंकर स्वरूपाचें असतें. उदाहरण म्हणून आपण दोन मुद्दे विचारांत घेऊं एक हिंदूंची लिंगोपासना व दुसरा ख्रिस्ती लोकांचा 'सॅक्रॅमेन्ट' नांवाचा विधि. ख्रिस्ती लोकांच्या दृष्टीने लिंगोपासना ही एक भयंकर गोष्ट आहे. आणि हिंदु लोकांच्या दृष्टीने ख्रिस्ती लोकांचा हा 'सॅक्रॅमेन्ट' विधि

भयंकर स्वरूपाचा आहे. हिंदु लोक असें म्हणतात की, एखाद्या माणसाला ठार मारणें, त्याचें मांस भक्षण करणें, त्याचें रक्त पिणें व अशा रीतीने त्याच्या अंगचे सद्‌गुण आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न करणें हा जो ख्रिस्ती लोकांचा सॅक्रॅमेन्ट नामक विधि आहे, तो म्हणजे शुद्ध रानटीपणा आहे. कांही रानटी जमातीचे लोक या गोष्टी करीत असतात. एखादा मनुष्य जर शूर असला तर त्याला ते ठार मारतात व त्याचें काळीज खातात, कारण या लोकांची अशी समजूत असते की अशा रीतीने त्या माणसाच्या अंगचे धैर्य व शौर्य हे गुण आपल्या अंगीं उतरतील. सर जॉन ल्युबॉकसारखे धर्मनिष्ठ ख्रिस्तीदेखील ही गोष्ट मान्य करतात आणि सांगतात की ख्रिती धर्मातील या 'सॅक्रॅमेन्ट' नामक विधीचें मूळ या रानटी कल्पनेंत आहे. या विधीच्या मुळाचा हा इतिहास ख्रिस्ती लोकांना अर्थातच मान्य नाही. त्याचा गर्भितार्थ काय असेल हा विचारच त्यांच्या मनाला शिवत नाही. या विधीचें पावित्र्यच त्यांना मान्य असून तेवढेंच जाणून घेण्याची त्यांची इच्छा असते. याप्रमाणे धर्माच्या अनुष्ठानात्मक भागांत सुद्धा सर्वसंमत व सर्वमान्य असें एकहि प्रतीक नाही. मग धर्मामधे सार्वजनीनता कुठे आहे ? अशा स्थितींत सार्वजनीन धर्माची निर्मिति करणें कसें शक्य आहे ? पण हा सार्वजनीन धर्म आधीपासूनच अस्तित्वांत आहे. त्याचें स्वरूप काय आहे तें आता आपण पाहूं.

विश्वबंधुत्वाविषयी आपण बरेंच ऐकतों. आणि विशेषतः या विश्वबंधुत्वाची शिकवण देण्यासाठी ज्या अनेक संस्था स्थापन करण्यांत आलेल्या आहेत त्यांच्याविषयीसुद्धा आपण बरेंच ऐकतों. मला एक फार जुनी गोष्ट आठवते. भारतामधे मद्यपान ही फार

वाईट गोष्ट मानलेली आहे. दोन भाऊ होते. त्यांना एका रात्रीं चोरून दारू पिण्याची इच्छा झाली. त्यांचा एक सनातनी वृत्तीचा चुलता होता व तो शेजारच्याच खोलींत झोपलेला होता. प्रत्यक्ष मद्यपानाला सुरवात करण्यापूर्वी ते एकमेकांना म्हणाले की आपण खूप शांतता राखली पाहिजे, नाही तर आपले काका जागे होतील. दारू पीत असतांना "शांत राहा; काका जागे होतील" असें ते एकमेकांना शांत करण्यासाठी चढत्या आवाजांत पुन:पुन: म्हणूं लागले. आणि त्यांची ही आरडाओरड वाढतांच त्यांचे काका जागे होऊन खोलींत आले व त्यांना सर्व हकीकत कळली. आपण सर्वजण या दारूबाजांप्रमाणे टाहो फोडतों की 'विश्वबंधुत्व हवें ! आपण सर्व समान आहोंत, म्हणून आपण आपला एक पंथ स्थापूंया.' आपण एखाद्या पंथाची स्थापना केल्यानेच आपण समतेच्या विरुद्ध वागतों आणि समता नाहीशी होते. मुसलमान लोकहि या विश्वबंधुत्वाची घोषणा करतात, पण वस्तुस्थिति काय दर्शविते ? जो इस्लाम धर्माचा अनुयायी नाही त्याला त्यांच्या भ्रातृसमाजांत प्रवेश मिळत नाही. उलट त्याचा शिरच्छेद होण्याची शक्यताच अधिक आहे. ख्रिस्ती लोकसुद्धा विश्वबंधुत्वाविषयी बोलतात. परंतु जो ख्रिस्ती नाही त्याच्या कपाळीं अनंत नरकवासच लिहिलेला आहे असें ते मानतात.

आणि अशा रीतीने आपण विश्वबंधुत्व व समता यांचा या जगांत शोध चालविलेला आहे. जेव्हा तुम्ही विश्वबंधुत्व व समता यांविषयी कुणाला बोलतांना ऐकाल, तेव्हा तुम्ही थोडें थांबा व सावध राहा असें तुम्हांला माझें सांगणें आहे, कारण असल्या बोलण्याच्या मागे प्राय: कमालीचा स्वार्थ दडलेला असतो. "हिवाळ्यांत कधी कधी आकाशांत ढग जमतात, मेघगर्जना होते,

पण पाऊस मात्र पडत नाही. पण वर्षाऋतूंत मेघगर्जना न होतां मुसळधार पाऊस पडतो." याचप्रमाणे जे खरे कार्यकर्ते असतात व ज्यांच्या अंतःकरणांत विश्वबंधुत्वाची जाणीव खरोखरच निर्माण झालेली आहे, असे लोक लंब्याचवड्या गोष्टी करीत नाहीत, ते विश्वबंधुत्वाच्या नांवाखाली पंथ-उपपंथाची स्थापना करीत नाहीत; परंतु त्यांच्या कृति, त्यांची वागणूक, त्यांचें एकंदर जीवन असें असतें की त्यावरून, सर्व मानवांविषयी त्यांना किती प्रेम व सहानुभूति आहे, सर्व मानवजातीविषयी बंधुत्वाची भावना त्यांच्या ठिकाणीं किती सत्यत्वाने वास करीत आहे याची आपल्याला स्पष्ट कल्पना येते. असे लोक बोलत नाहीत, प्रत्यक्ष कृति करतात व तसें जीवन जगतात. हें जग वाचाळ लोकांनी भरलेलें आहे. आज आपल्याला पोकळ भाषणांपेक्षा प्रामाणिक कार्याची अधिक गरज आहे.

आतापर्यंत धर्माच्या बाबतींत सार्वजनीन असा भाग शोधून काढणें किती कठीण आहे हें आपण पाहिलें. तथापि धर्माची अशी बाजू आहे हेंहि आपण जाणतों. आपण सर्व माणसें आहोंत, पण आपण सर्वजण समान आहोंत काय? निश्चितच नाही. कोण म्हणतो की आपण सर्वजण समान आहोंत? फक्त खुळीं माणसेंच असें म्हणूं शकतील. आपली बुद्धि, आपली शक्ति वा आपली शरीररचना हीं सारखीं आहेत काय? एक मनुष्य दुसऱ्यापेक्षा अधिक सशक्त आहे, एकापेक्षा दुसरा अधिक बुद्धिमान आहे. जर आपण सर्वजण समान असतों तर ही विषमता कां असावी? कोणीं ही निर्माण केली?—आम्हींच. क्षमता, बुद्धि व शारीरिक बल यांच्यांत कमी-अधिकपणा असल्यामुळेच आमच्यामधील ही विषमता निर्माण झालेली आहे. असें असूनहि समतेचें तत्त्व

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३२८९५ वि: १रिवर्ड
क्रमांक १४१८ नों दि: १८-११-६२

आपल्याला अत्यंत आवडतें हें आपल्याला माहीत आहे. आपण सर्व मानव आहोंत, पण आपल्यापैकी कांही पुरुष आहेत तर कांही स्त्रिया आहेत. कुणी काळा आहे, तर कुणी गोरा आहे. पण हीं सर्व माणसेंच आहेत, हे सर्वजण मानवजातींतच अंतर्भूत आहेत. आपले चेहरे भिन्न आहेत. सारख्या चेहऱ्याच्या दोन व्यक्ति कधीच दिसत नाहीत. तरीपण आपण सर्वजण माणसेंच आहोंत. सर्वांना सामान्य असणारें हें मानवत्व कुठे आहे ? मला दिसणारे स्त्री-पुरुष काळे किंवा गोरे असतील, पण त्या सर्वांमधे सगळयांना सामान्य असणारें मानवत्व वसत आहे हें मला माहीत आहे. तें धरण्याचा, तें अनुभवण्याचा आणि तें प्रत्यक्ष रूपांत पाहण्याचा प्रयत्न केल्यास मला तें गवसत नसेल, पण तें आहे याबद्दल माझी खात्री आहे. जर कोणत्या एखाद्या गोष्टीच्या अस्तित्वाची मला खात्री असेल तर ती सर्वांमधे सामान्यपणें वसत असलेल्या मानवत्वाचीच होय. या सर्वसामान्य मानवत्वामधूनच तुम्ही स्त्री किंवा पुरुष असल्याचें मला ज्ञान होतें. सार्वजनीन धर्माचेंहि असेंच आहे. ईश्वराच्या रूपाने तो सर्व धर्मांमधे अनुस्यूत आहे. अनंत काळापासून तो अस्तित्वांत आहे व अनंत काळ तो अस्तित्वांत राहील. भगवान म्हणतात, "या सर्व मण्यांमधून जाणारा मी दोरा आहें," आणि प्रत्येक मणि हा एक धर्म वा धर्मपंथ आहे. असे हे विविध मणि असून ईश्वर म्हणजे त्या सर्वांमधून जाणारें किंवा त्यांना गोवणारें एक सूत्र आहे. पण दुःखाची गोष्ट ही की बहुसंख्य लोकांना याची मुळीच जाणीव नाही.

विविधतेंत एकता हा सृष्टीचा नियम आहे. आपण सर्व माणसें असलों तरी परस्परांपासून पृथक् आहोंत. मानवजातीचे घटक या दृष्टीने तुम्ही व मी एक आहोंत, पण श्रीयुत अमुक

अमुक असें मला म्हटलें तर मी तुमच्यापासून भिन्न आहें. पुरुष या दृष्टीने तुम्ही स्त्रीपासून भिन्न आहांत, परंतु मानव या दृष्टीने तुम्ही स्त्रीशीं एकरूप आहांत. मानव म्हणून तुम्ही इतर पशूंपासून निराळे आहांत. पण सजीव वस्तु या दृष्टीने पुरुष, स्त्री, पशु, वनस्पति सर्व एकच होत. आणि 'सत्ता' या दृष्टीने तुम्ही सर्व विश्वाशीं एकरूप आहांत. ती विश्वव्यापक विराट सत्ता म्हणजे ईश्वर होय आणि विविधतेने भरलेल्या या विश्वांतील तोच अंतिम एकत्व होय. त्याच्या ठिकाणीं आपण सारे एक आहोंत. पण ह्या व्यक्त सृष्टींत विविधता वा भिन्नता कायम राहणारच. आपल्या कर्मांत वा आपल्या शक्तीच्या बाह्य आविष्कारांत भिन्नता कायम राहणारच. म्हणून एकाच प्रकारच्या धर्ममतांवर अखिल मानवजातीने विश्वास ठेवावा अशी जर सार्वजनीन धर्माविषयी आपली कल्पना असेल तर ही गोष्ट पूर्णपणें अशक्य आहे हें आता आपल्या लक्षांत येईल. ही गोष्ट कदापि शक्य नाही. सर्व चेहरे सारखे असतील असा काळ कधीहि येणार नाही. त्याचप्रमाणे एकच पुराण सर्वमान्य होईल अशी जर आपली अपेक्षा असेल तर तीहि फोल आहे. असें होणें कधीहि शक्य नाही. त्याचप्रमाणे सर्व जगांत एकच अनुष्ठान-पद्धति असणें शक्य नाही. अशी परिस्थिति कधीच अस्तित्वांत येणार नाही. आणि यदाकदाचित् जर तशी परिस्थिति निर्माण झाली तर जगाचा लोप झाल्याशिवाय राहणार नाही, कारण विविधता हेंच जीवनाचें आदितत्त्व आहे. आपल्याला विशिष्ट रूपें कशीं प्राप्त झालीं ? भिन्नत्वामुळे. संपूर्ण समानता झाल्यास आपला विनाश होईल. चोहोकडे सारखेपणें व पूर्णपणें पसरणें हा उष्णतेचा गुणधर्म आहे. समजा की या खोलींतील उष्णता

याप्रमाणे सगळीकडे सारखी पसरली तर कार्यतः उष्णता म्हणून येथे कांही उरणारच नाही. या विश्वांत गति कशी उत्पन्न होते ? समतोलपणा नष्ट झाल्यामुळे ? हें विश्व नष्ट झाल्याशिवाय पूर्ण समानता व एकता उत्पन्न होणार नाहीत. त्याशिवाय ही गोष्ट अशक्यच आहे. इतकेंच नव्हे तर अशा प्रकारची समत्वरूपी एकता प्रस्थापित होणें हें धोक्याचें आहे. आपण सर्वांनी एकाच प्रकारें विचार करावा अशी इच्छा आपण बाळगूं नये. तसें झाल्यास विचार करायला विषयच मुळी उरणार नाही. पदार्थ-संग्रहालयांत ठेवलेल्या इजिप्त देशांतील 'ममीं'प्रमाणे आपण सर्वजण समान होऊन जाऊं, एकमेकांकडे नुसतें पाहत राहूं आणि कोणत्याहि प्रकारचा विचार आपल्या मनांत उठणार नाही. हा भेद, ही भिन्नता, हा समानतेचा अभाव हाच आपल्या साऱ्या प्रगतीचा आत्मा आहे आणि हाच आपल्या विचारांचें मूळ आहे. आणि ही विविधता सर्वदा राहिलीच पाहिजे.

मग मी सार्वजनीन धर्माचा आदर्श कशाला म्हणतों ? जगांतील सर्व माणसें मानतील असें एखादें सार्वजनीन तत्त्वज्ञान, किंवा एखादें सार्वजनीन पुराण किंवा एखादी सार्वजनीन अनुष्ठान-पद्धति असा मी सार्वजनीन धर्माचा अर्थ करीत नाहीं; कारण मला माहीत आहे की हें गुंतागुंतीचें, विचित्र रचनेचें व अत्यंत आश्चर्यकारक असें जें विश्वरूपी यंत्र आहे तें असेंच चालूं राहणार आहे. मग आपल्याला या ठिकाणीं काय करतां येईल ? विश्वाचें हें यंत्र आपल्याला सुरळितपणें चालवितां येईल, त्यांतील घर्षण कमी करतां येईल, त्यांतील चक्रांमधे वंगण घालतां येईल. तें कसें ?—तर भिन्नतेची स्वाभाविक आवश्यकता मान्य करून. ज्याप्रमाणे आपण स्वभावतः एकत्व स्वीकारलें त्याप्रमाणेच

विविधतेलाहि आपण मान्यता दिली पाहिजे. एकच सत्य हजारो मार्गांनी व्यक्त होऊं शकतें आणि त्यांतील प्रत्येक मार्ग हा आपापल्यापरी सारखाच सत्य असूं शकतो ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे. एकाच वस्तूकडे आपल्याला हजारो दृष्टींनी पाहतां येतें, आणि कोणत्याहि दृष्टीने पाहिलें तरी वस्तु मात्र तीच असते हें आपण जाणलें पाहिजे. सूर्याचें उदाहरण घ्या. कल्पना करा की या पृथ्वीवरील एक मनुष्य सूर्योदयाच्या वेळीं सूर्याकडे पाहत आहे. सूर्य त्याला एका मोठ्या गोलासारखा दिसतो. आता कल्पना करा की तोच मनुष्य सूर्याकडे प्रवास करीत आहे, त्याने आपल्याबरोबर कॅमेरा घेतलेला आहे, प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यांत त्याने सूर्याचीं छायाचित्रें घेतलेलीं आहेत, आणि शेवटीं तो प्रत्यक्ष सूर्यावर पोहोचलेला आहे. प्रत्येक टप्प्यावरील सूर्याचें छायाचित्र दुसऱ्या टप्प्यावरील छायाचित्रापेक्षा भिन्न असणार. आणि जेव्हा तो परत येईल तेव्हा आपल्याला वाटेल की त्याच्याजवळ निरनिराळ्या सूर्यांचीं निरनिराळीं छायाचित्रें आहेत. पण आपल्याला हें माहीत आहे की त्या माणसाने प्रवासाच्या विभिन्न टप्प्यांमधे हीं छायाचित्रें घेतलेलीं असून तीं सर्व त्या एकाच सूर्याचीं आहेत. ईश्वराच्या बाबतींतदेखील असेंच घडतें. उच्च वा कनिष्ठ तत्त्वज्ञान, उदात्त वा निकृष्ट पुराणें, सुसंस्कृत धार्मिक विधि वा रानटी लोक करतात तसली हीन प्रकारची मूर्तिपूजा, या सर्वांच्या साहाय्याने प्रत्येक धर्मपंथ, प्रत्येक व्यक्ति, प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक धर्म जाणीवपूर्वक किंवा अजाणतां ईश्वराप्रत जाण्याचा मार्ग आक्रमीत असतो. मानवाला लाभलेला सत्याचा प्रत्येक अनुभव हा त्या ईश्वराचेंच दर्शन असतें, दुसऱ्या कशाचें नव्हे. कल्पना करा की आपण हातांत

भांडीं घेऊन पाणी आणण्यासाठी एखाद्या तलावावर गेलों. एका-जवळ प्याला आहे, दुसऱ्याजवळ घागर आहे, तिसऱ्याजवळ बादली आहे आणि चवथ्याजवळ दुसरें कांहीतरी आहे. आपण सर्वजण आपापलीं भांडीं भरून घेतों. आपल्यापैकी प्रत्येकाजवळ जें भांडें असेल त्या भांड्याचा आकार प्रत्येकाने भरून घेतलेल्या पाण्याला येणार हें उघड आहे. ज्याच्याजवळ प्याला असेल त्याच्या पाण्याला प्याल्याचा आकार येणार. ज्याने घागर आणली असेल त्याच्याजवळच्या पाण्याला घागरीचा आकार येणार. हीच गोष्ट इतर भांड्यांनाहि लागू आहे. पण प्रत्येकाच्या भांड्यांत पाणीच असतें, त्याव्यतिरिक्त दुसरें कांहीच नसतें. धर्माच्या बाबतींत-देखील हीच गोष्ट खरी आहे. आपलीं मनें ह्या भांड्यांसारखीं आहेत, आणि आपल्यापैकी प्रत्येकजण ईश्वरी साक्षात्काराच्या लाभासाठी प्रयत्न करीत आहे. हीं निरनिराळीं भांडीं भरणाऱ्या पाण्याप्रमाणे ईश्वराचें स्वरूप आहे. आणि प्रत्येक भांड्यामधे त्या भांड्याच्या आकारानुरूप ईश्वराचें दर्शन होतें. असें असलें तरी ईश्वर एकच आहे. प्रत्येकाला त्या एकाच ईश्वराचा अनुभव येत असतो. धर्माच्या बाबतींत असलेली सार्वजनीनता याच स्वरूपांत आपल्याला दिसून येऊं शकते.

तात्त्विक दृष्ट्या विचार केला तर ही गोष्ट ठीकच आहे. पण खरा प्रश्न असा आहे की निरनिराळ्या धर्मांतील हा समन्वय प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचा कांही मार्ग उपलब्ध आहे काय ? सर्व धर्ममतें खरीं आहेत ही गोष्ट फार प्राचीन काळापासून मान्य झालेली आहे असें आपल्याला आढळून येतें. भारत, अलेक्झांड्रिया, युरोप, चीन, जपान, तिबेट आणि शेवटीं अमेरिका या सर्व देशांत, ज्यायोगें सर्व धर्म प्रेमाने एकत्र नांदतील

असा सर्वसंमत धर्म स्थापन करण्याचे शेकडो प्रयत्न आतापर्यंत झालेले आहेत. परंतु व्यावहारिक योजनेच्या अभावीं ते सर्व अयशस्वी झालेले आहेत. जगांतील सर्व धर्म खरे आहेत ही गोष्ट पुष्कळांनी मान्य केलेली आहे. पण या सर्व धर्मांच्या संगमामधे प्रत्येक धर्म स्वत:चें वैशिष्टच कायम राखील अशा तऱ्हेने सर्व धर्म एकत्रित आणण्याचा व्यवहार्य मार्ग कोणींहि दाखविलेला नाही. कोणत्याहि धर्माच्या अनुयायाचें व्यक्ति-वैशिष्टच अबाधित राखून त्याला दुसऱ्या धर्मांशीं कसें एकजीव होतां येईल हें दाखविणारी जी योजना पुढे येईल तीच व्यवहार्य ठरेल. पण आतापर्यंत सर्व धर्मांमधे एकवाक्यता निर्माण करण्याचे जे प्रयत्न झाले त्या सर्वांमधे, सर्व धर्म सत्य आहेत हा सिद्धान्त मान्य झालेला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र या धर्मांना कांही विशिष्ट मतांत जखडून ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला आणि परिणामीं परस्परांशीं विरोध करणारे, भांडणारे व वरचढ होण्याचा प्रयत्न करणारे असे आणखी कांही नवे पंथ निर्माण झाले.

माझीसुद्धा धर्मसमन्वयाची एक योजना आहे. ती कार्यक्षम ठरेल किंवा नाही हें मला माहीत नाही. चर्चेसाठी मी ती आपल्यापुढे मांडूं इच्छितों. माझी योजना कोणती? प्रथमत: सर्व मानवजातीला मला असें आवर्जून सांगावयाचें आहे की "विनाश करूं नका" या तत्त्वावर निष्ठा ठेवा. मूर्तिभंजक सुधारक जगाचें कांही चांगलें करूं शकत नाहीत. कोणतीहि वस्तु फोडूं नका, तिचा नाश करूं नका, तर नवीन कांहीतरी उभारा. तुम्हांला शक्य असेल ती मदत करा. नाही तर हात जोडून बाजूला उभे राहा आणि जें कांही घडत आहे तें घडूं

द्या. तुम्हांला दुसऱ्याला मदत करतां येत नसली तरी निदान दुसऱ्याचें अनिष्ट करूं नका. कोणाहि माणसाच्या प्रामाणिक श्रद्धेविरुद्ध एकहि शब्द बोलूं नका, अगदी ब्र काढूं नका. दुसरी गोष्ट अशी की ज्या स्थानावर मनुष्य उभा आहे त्या स्थानावरूनच त्याला वर नेण्याचा प्रयत्न करा. ईश्वर हेंच जर सर्व धर्मांचें केंद्रस्थान असेल, आणि धर्मरूपी अनेक त्रिज्यांपैकी कोणत्याहि त्रिज्येवरून जर आपण त्याच ईश्वराच्या दिशेने मार्गक्रमण करीत असूं तर आपण सर्वजण त्याच केंद्राप्रत पोहोचल्याशिवाय राहणार नाहीं. आणि ज्या ठिकाणीं सर्व त्रिज्या मिळतात त्या केंद्रस्थानीं आपले सर्व मतभेद नाहीसे होतील. परंतु जोंपर्यंत आपण केंद्रस्थानापर्यंत पोहोचत नाहीं तोंपर्यंत हे सारे मतभेद, ही सारी भिन्नता राहणारच. या साऱ्या त्रिज्या एकाच केंद्रस्थानांत येऊन मिळतात. एखादी व्यक्ति आपल्या प्रकृतिधर्माप्रमाणे यांपैकी कोणत्यातरी एका मार्गानें प्रवास करते, तर दुसरी व्यक्ति दुसऱ्या मार्गानें जाते. आणि आपण जर आपापल्या दिशेने प्रवास चालूं ठेवला तर आपण सर्वजण केंद्रस्थानीं निश्चितपणें पोहोचल्याशिवाय राहणार नाही, कारण सर्व रस्ते जसे रोम येथे येऊन मिळतात तशाच या सर्व त्रिज्या एकाच केंद्रस्थानीं येऊन मिळतात. आपल्यापैकी प्रत्येकजण स्वाभाविकपणेंच आपल्या स्वभावधर्माप्रमाणे आपापली प्रगति व विकास करून घेत आहे. प्रत्येक व्यक्ति यथासमय अंतिम सत्याचें ज्ञान प्राप्त करून घेईलच, कारण खरें पाहतां माणूसच स्वतःचा शिक्षक आहे. तुम्ही आणि मी काय करूं शकणार ? तुम्हांला असें वाटतें काय की तुम्ही एखाद्या लहान मुलालादेखील शिकवूं शकाल ? नाही. तुम्हांला तें शक्य नाही.

असा सर्वसंमत धर्म स्थापन करण्याचे शेकडो प्रयत्न आतापर्यंत झालेले आहेत. परंतु व्यावहारिक योजनेच्या अभावीं ते सर्व अयशस्वी झालेले आहेत. जगांतील सर्व धर्म खरे आहेत ही गोष्ट पुष्कळांनी मान्य केलेली आहे. पण या सर्व धर्मांच्या संगमामधे प्रत्येक धर्म स्वत:चें वैशिष्टय कायम राखील अशा तऱ्हेने सर्व धर्म एकत्रित आणण्याचा व्यवहार्य मार्ग कोणींहि दाखविलेला नाही. कोणत्याहि धर्माच्या अनुयायाचें व्यक्ति-वैशिष्टय अबाधित राखून त्याला दुसऱ्या धर्मांशीं कसें एकजीव होतां येईल हें दाखविणारी जी योजना पुढे येईल तीच व्यवहार्य ठरेल. पण आतापर्यंत सर्व धर्मांमधे एकवाक्यता निर्माण करण्याचे जे प्रयत्न झाले त्या सर्वांमधे, सर्व धर्म सत्य आहेत हा सिद्धान्त मान्य झालेला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र या धर्मांना कांही विशिष्ट मतांत जखडून ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला आणि परिणामीं परस्परांशीं विरोध करणारे, भांडणारे व वरचढ होण्याचा प्रयत्न करणारे असे आणखी कांही नवे पंथ निर्माण झाले.

माझीसुद्धा धर्मसमन्वयाची एक योजना आहे. ती कार्यक्षम ठरेल किंवा नाही हें मला माहीत नाही. चर्चेसाठी मी ती आपल्यापुढे मांडूं इच्छितों. माझी योजना कोणती? प्रथमत: सर्व मानवजातीला मला असें आवर्जून सांगावयाचें आहे की "विनाश करूं नका" या तत्त्वावर निष्ठा ठेवा. मूर्तिभंजक सुधारक जगाचें कांही चांगलें करूं शकत नाहीत. कोणतीहि वस्तु फोडूं नका, तिचा नाश करूं नका, तर नवीन कांहीतरी उभारा. तुम्हांला शक्य असेल ती मदत करा. नाही तर हात जोडून बाजूला उभे राहा आणि जें कांही घडत आहे तें घडूं

द्या. तुम्हांला दुसऱ्याला मदत करतां येत नसली तरी निदान दुसऱ्याचें अनिष्ट करूं नका. कोणाहि माणसाच्या प्रामाणिक श्रद्धेविरुद्ध एकहि शब्द बोलूं नका, अगदी ब्र काढूं नका. दुसरी गोष्ट अशी की ज्या स्थानावर मनुष्य उभा आहे त्या स्थानावरूनच त्याला वर नेण्याचा प्रयत्न करा. ईश्वर हेंच जर सर्व धर्मांचें केंद्रस्थान असेल, आणि धर्मरूपी अनेक त्रिज्यांपैकी कोणत्याहि त्रिज्येवरून जर आपण त्याच ईश्वराच्या दिशेने मार्गक्रमण करीत असूं तर आपण सर्वजण त्याच केंद्राप्रत पोहोचल्याशिवाय राहणार नाहीं. आणि ज्या ठिकाणीं सर्व त्रिज्या मिळतात त्या केंद्रस्थानीं आपले सर्व मतभेद नाहीसे होतील. परंतु जोंपर्यंत आपण केंद्रस्थानापर्यंत पोहोचत नाहीं तोंपर्यंत हे सारे मतभेद, ही सारी भिन्नता राहणारच. या साऱ्या त्रिज्या एकाच केंद्रस्थानांत येऊन मिळतात. एखादी व्यक्ति आपल्या प्रकृतिधर्माप्रमाणे यांपैकी कोणत्यातरी एका मार्गानें प्रवास करते, तर दुसरी व्यक्ति दुसऱ्या मार्गानें जाते. आणि आपण जर आपापल्या दिशेने प्रवास चालूं ठेवला तर आपण सर्वजण केंद्रस्थानीं निश्चितपणें पोहोचल्याशिवाय राहणार नाही, कारण सर्व रस्ते जसे रोम येथे येऊन मिळतात तशाच या सर्व त्रिज्या एकाच केंद्रस्थानीं येऊन मिळतात. आपल्यापैकी प्रत्येकजण स्वाभाविकपणेंच आपल्या स्वभावधर्माप्रमाणे आपापली प्रगति व विकास करून घेत आहे. प्रत्येक व्यक्ति यथासमय अंतिम सत्याचें ज्ञान प्राप्त करून घेईलच, कारण खरें पाहतां माणूसच स्वतःचा शिक्षक आहे. तुम्ही आणि मी काय करूं शकणार ? तुम्हांला असें वाटतें काय की तुम्ही एखाद्या लहान मुलालादेखील शिकवूं शकाल ? नाही. तुम्हांला तें शक्य नाही.

लहान मूल स्वतःच स्वतःला शिकवीत असतें. त्याला संधि देणें व त्याच्या मार्गांतील अडथळे दूर करणें एवढेंच तुमचें कर्तव्य आहे. एखादें रोपटें वाढतें. तुम्ही त्याची वाढ करतां काय? त्याच्याभोवती कुंपण घालणें, गुरें त्याला खाणार नाहीत असा बंदोबस्त करणें एवढेंच तुमचें काम. या ठिकाणीं तुमची कामगिरी संपते. तें रोपटें स्वतःच वाढतें. प्रत्येक व्यक्तीच्या आध्यात्मिक विकासाचीसुद्धा अशीच गोष्ट आहे. कोणीहि दुसरा मनुष्य तुम्हांला शिकवूं शकत नाही, किंवा तुमची आध्यात्मिक उन्नति घडवून आणूं शकत नाही. तुम्हींच स्वतःला शिकविलें पाहिजे. तुमचा विकास तुमच्या आंतूनच झाला पाहिजे.

बाहेरचा शिक्षक काय करूं शकतो? विद्यार्थ्याच्या मार्गांतील अडथळे तो थोडेसे दूर करूं शकतो आणि त्या ठिकाणीं त्याची कामगिरी संपते. आणि म्हणूनच शक्य तेवढी मदत करा, पण विध्वंस करूं नका. तुम्ही कुणाची आध्यात्मिक उन्नति घडवून आणूं शकाल ही कल्पना सोडून द्या. ती अशक्य गोष्ट आहे. तुमच्या आत्म्याशिवाय दुसरा कोणीहि तुमचा शिक्षक नाही. ही गोष्ट लक्षांत घ्या. यांतून काय निष्पन्न होतें? समाजामधे स्वभावधर्माचे विविध नमुने आपल्याला दिसतात. जगांत अनेक प्रकारचे संस्कार व मनोवृत्ति वा कल असलेलीं माणसें आहेत. त्या सर्वांचें अगदी धोपट वर्गीकरण करणें अशक्य आहे. पण आपल्या उद्देशाच्या अनुरोधानें त्यांचे आपल्याला चार वर्ग करतां येतील. पहिला वर्ग म्हणजे कर्मशील माणसांचा होय. सतत कार्य करीत राहणें त्याला आवडतें. त्याच्या स्नायूंत कर्म करण्याची खूप शक्ति असते. सतत कर्म करीत राहणें—रुग्णालयें

बांधणें, लोकोपयोगी कामें करणें, रस्ते बांधणें, योजनांची आखणी करून त्या अमलांत आणणें--हेंच त्याचें ध्येय असतें. दुसरा वर्ग हा भावनाशील माणसांचा होय. सुंदर आणि उदात्त गोष्टींवर त्याचें अत्यंत प्रेम असतें. सौंदर्याच्या विचारांत तो सदा रममाण असतो, नैसर्गिक सौंदर्य त्याला फार प्रिय असतें, आणि प्रेम व प्रेमस्वरूप ईश्वर यांचा तो उपासक असतो. जगामधे आतापर्यंत होऊन गेलेले थोर महात्मे, प्रेषित, ईश्वरी अवतार यांवर तो अगदी मनापासून प्रेम करतो. येशू ख्रिस्त वा भगवान् बुद्ध यांचें अस्तित्व बुद्धिवादाच्या आधारावर सिद्ध करतां येईल किंवा नाही याची तो पर्वा करीत नाही. येशूने टेकडीवर जाऊन जो धर्मोपदेश केला त्याची नक्की तारीख कोणती यालाहि तो विशेष किंमत देत नाही, किंवा कृष्णजन्माची निश्चित तिथि कोणती याचीहि तो चिंता करीत नाही. त्यांचें व्यक्तिमत्त्व किंवा त्यांचें मनोहर रूप हींच त्याला अधिक महत्त्वाचीं वाटतात. प्रेम करणाऱ्या भावनाशील माणसाचा स्वभाव व त्याचा आदर्श हा अशा प्रकारचा असतो. तिसरा वर्ग हा गूढतत्त्ववाद्यांचा होय. अशा माणसाला आत्मविश्लेषण करण्याची इच्छा असते. मानवी मनाच्या प्रक्रिया कशा चालतात, कोणत्या शक्ति आंतून कार्य करीत असतात, आणि त्या कशा ओळखाव्या, त्यांचें संचलन व नियंत्रण कसें करावें हें सारें समजून घेण्याची त्याची इच्छा असते. गूढतत्त्ववाद्याचें मन हें असें असतें. आता उरलेला चवथा वर्ग हा तत्त्वज्ञांचा होय. प्रत्येक गोष्टीचें मूल्य-मापन करण्याची त्यांची इच्छा असते. मानवी तत्त्वज्ञानाच्या मर्यादेपलीकडेहि आपली बुद्धि चालविण्याची ते धडपड करीत असतात.

बहुतांश मानवांचें समाधान करण्याचें सामर्थ्य ज्याच्या ठिकाणीं आहे असा धर्म जर आपल्याला हवा असेल तर वरील सर्व प्रकारच्या मनोवृत्तींच्या माणसांना उपयुक्त सामुग्री पुरविण्याची शक्ति त्याच्या ठिकाणीं असली पाहिजे. आणि ज्यांच्या ठिकाणीं या शक्तींचा अभाव आहे असे सारे विद्यमान धर्मपंथ एकांगी बनतात. जो धर्मपंथ भक्ति व प्रेम यांची शिकवण देतो तो आपण विचारांत घेऊं. या पंथाचे अनुयायी सदा सर्वकाळ गातात, रडतात व प्रेमाचा प्रचार करतात. त्यांच्याकडे जाऊन तुम्ही जर म्हणाल की, "मित्रांनो, तुम्ही जें म्हणतां तें खरें आहे, पण मला याहून अधिक बलसंपन्न असें कांहीतरी हवें आहे; मला थोडीशी तर्कयुक्ति, थोडेसें तत्त्वज्ञान हवें आहे; मला पायरीपायरीने व तर्कयुक्तीला अनुसरून प्रत्येक गोष्ट समजून घ्यायची आहे," तर ते ताबडतोब तुम्हांला बाहेर काढून देतील. ते तुम्हांला 'बाहेर जा' एवढेंच सांगून थांबणार नाहीत, तर त्यांना शक्य असल्यास ते तुम्हांला परलोकींदेखील पाठवितील. याचा परिणाम हाच होतो की असा धर्मपंथ केवळ भावनाशील व्यक्तींनाच मदत करूं शकतो. ते इतरांना मदत करीत नाहीत, इतकेंच नव्हे, तर त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न करतात. आणि दुष्टपणाची कमाल जर कोणती असेल तर ती ही की ते इतरांना साहाय्य तर करीत नाहीतच, पण शिवाय त्यांच्या प्रामाणिकपणावरहि त्यांचा विश्वास नसतो. तसेंच आणखी एक पंथ आहे. तो म्हणजे तत्त्वज्ञांचा. भारताच्या आणि पौर्वात्यांच्या ज्ञानाच्या गोष्टी ते सांगतात. ते मोठमोठे मानसशास्त्रीय शब्द वापरतात, लंब्याचवड्या शब्दांचें अवडंबर माजवितात. पण जर माझ्यासारखा सामान्य मनुष्य त्यांच्याकडे गेला व म्हणूं लागला, "मला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
का. क्र. 92320

अध्यात्म शिकवाल काय ?"—तर यावर ते प्रथम हसतील, व उद्गारतील, "अहो, तुमची बुद्धि आमच्या मानाने फारच खालच्या दर्जाची आहे. अध्यात्म तुम्हांला कसें समजणार ?" स्वतःला फार मोठे समजणारे असे हे तत्त्वज्ञ आहेत. तेसुद्धा तुम्हांला बाहेर काढून लावतात. दुसरे कांही गूढतत्त्ववादी धर्मपंथ आहेत. जीवाच्या निरनिराळ्या भूमिका, मनाच्या निरनिराळ्या अवस्था, मनाची शक्ति इत्यादींविषयी ते पुष्कळ कांही बोलत असतात. आणि एक सामान्य माणूस या नात्याने तुम्ही जर त्यांना म्हणालांत, "मला प्रत्यक्ष करतां येईल अशी एखादी चांगली गोष्ट सांगा. मला विशेष विचार करतां येत नाही. मला झेपेल असें कांही तरी मला द्याल काय ?"—तर ते हसून म्हणतील, "ऐका हो, हा मूर्ख काय म्हणतो तें. त्याला कांही समजत नाही. त्याचें जीवन व्यर्थ आहे." जगांत सगळीकडे असेंच चालू आहे. या भिन्न धर्ममतांच्या अत्यंत कट्टर अशा पुरस्कर्त्यांना एका खोलीमधे बसवून त्यांच्या सुंदर उपहासात्मक स्मितांचीं छायाचित्रें घ्यावींत असें मला वाटतें !

धर्माची आजची स्थिति ही अशी आहे. जगांतील परिस्थिति ही अशी आहे. सर्व प्रकारच्या मनोवृत्तींच्या लोकांना स्वीकार्य वाटेल अशा धर्माचा प्रचार मला करावयाचा आहे. ज्ञान, भावना, गूढतत्त्ववाद आणि कर्मशीलता या सर्वांना त्यांत सारखाच वाव मिळायला हवा. महाविद्यालयांतील प्राध्यापक वर्ग, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ यांना तर्कविचार प्रिय असतो. त्यांना जेवढा तर्कविचार करावयाचा असेल तेवढा करूं द्या. तर्कविचार करतां करतां अशी एक स्थिति येईल की जेव्हा त्यांना कळून येतें की तर्कविचार टाकून दिल्याशिवाय पुढे जातां येत नाही. ते

म्हणतील, "ईश्वर, मोक्ष या साऱ्या खुळचट कल्पना आहेत, ते लोकभ्रम आहेत, ते टाकून द्या." यावर मी म्हणतों, "अहो तत्त्वज्ञ महाशय, हें तुमचें शरीर म्हणजे त्याहून मोठा भ्रम आहे. त्याचा त्याग करा. जेवायला घरीं जाऊं नका. तत्त्वज्ञानाचा वर्ग घेण्यासाठी जाऊं नका. शरीराचा त्याग करा. हें जर तुम्हांला जमत नसेल तर हार माना व गप्प बसा." सर्व जग हें एक आहे व सर्व जगामधे एकच तत्त्व भरलेलें आहे या तत्त्वज्ञानाच्या शिकवणीचा प्रत्यक्ष साक्षात्कार घडविण्याचें सामर्थ्य धर्मामधे असलें पाहिजे. त्याचप्रमाणे जर एखादा गूढतत्त्ववादी भेटला तर त्याचेंहि आपण स्वागत केलें पाहिजे, मनोविश्लेषणाचें शास्त्र त्याला समजावून सांगितलें पाहिजे, इतकेंच नव्हे, तर तें सोदाहरण त्याला पटवून दिलें पाहिजे. कांही भावनाशील माणसें भेटलीं तर त्यांच्याबरोबर बसून, ईश्वराचें नांव घेऊन हसलें पाहिजे, रडलें पाहिजे, प्रेमभावनेने बेभान झालें पाहिजे. एखादा कर्मशील माणूस भेटला तर आपल्या सर्वशक्तीनिशी त्याच्याबरोबर आपण कर्म केलें पाहिजे. या सर्वांचा समन्वय झाला तर सार्वजनीन धर्माच्या आदर्शाच्या अधिकांत अधिक जवळ गेल्यासारखें होईल. ईश्वरेच्छेने तत्त्वज्ञान, गूढतत्त्ववाद, भावनाशीलता, कर्मशीलता हे सर्व घटक सर्व माणसांच्या ठायीं पूर्णांशाने समभावें विद्यमान राहतील तर किती चांगलें होईल ! हाच आपला आदर्श आहे. पूर्ण मानवाचा माझा आदर्श हा असा आहे. ज्यांच्या ठिकाणीं यांपैकी एकदोन घटकच असतात त्यांना मी एकांगी म्हणतों. या जगांत अशा एकांगी लोकांचा भरणाच जास्त आहे. ज्या मार्गाने ते जात असतात तो एकच मार्ग त्यांना माहीत असतो आणि दुसरा कोणताहि मार्ग त्यांना महाभयंकर

व धोक्याचा वाटत असतो. या चारहि घटकांच्या समन्वयाने स्वत:चा समतोलपणें विकास करून घेणें हाच माझ्या मतें धर्माचा आदर्श आहे. भारतांत आम्ही ज्याला 'योग' असें म्हणतों त्याच्या द्वारें धर्माचा हा आदर्श प्राप्त होऊं शकतो. कर्मशील व्यक्तींच्या दृष्टीने मानवाचें समग्र मानवजातीशीं ऐक्य, गूढतत्त्ववाद्याच्या दृष्टीने जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य, भावनाशील व्यक्तींच्या दृष्टीने भक्त व प्रेमस्वरूप भगवान यांचें ऐक्य आणि तत्त्वज्ञाच्या दृष्टीने विश्वांतील सर्व वस्तूंचें ऐक्य, याचेंच नांव 'योग' होय. 'योग' हा संस्कृत शब्द असून योगाच्या या चार प्रकारांना संस्कृत भाषेंत निरनिराळीं नांवें आहेत. अशा प्रकारचा 'योग' साधण्यासाठी जो झटतो त्याचेंच नांव 'योगी'. कर्ममार्गाने जाणाऱ्या योग्याला 'कर्मयोगी' अशी संज्ञा आहे. भक्तीच्या मार्गाने ऐक्य साधण्याचा प्रयत्न करणाऱ्याला 'भक्तियोगी' असें म्हणतात. गूढतत्त्ववादाच्या मार्गाने हें ऐक्य प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्याला 'राजयोगी' म्हणतात. आणि तत्त्वज्ञानाच्या मार्गाने ऐक्याकडे जाणाऱ्याला 'ज्ञानयोगी' म्हणतात. अशा रीतीने 'योगी' शब्दांत ह्या सर्वांचा समावेश होतो.

प्रथमत: आपण राजयोगाचा विचार करूं. ह्या राजयोगाचा--ह्या मन:संयमाचा काय अर्थ आहे? तुमच्या ह्या इंग्लंड देशांत भूत पिशाच्चादि अनेक गोष्टींचा संबंध या योगाशीं लावला जातो. यासाठी प्रथमच मी आपणांस सांगूं इच्छितों की अशा गोष्टींशीं योगाचा काडीमात्र संबंध नाही. यांपैकी कोणताहि योग तर्कबुद्धीचा त्याग करीत नाही, फसवणुकीला बळी पडण्यास तो तुम्हांला सांगत नाही, किंवा कोणत्याहि प्रकारच्या पुरोहितांच्या हातांत आपली तर्कबुद्धि गहाण टाका असें

तो तुम्हांला म्हणत नाही. कोणत्याहि अतिमानवी देवदूताला आपली सारी निष्ठा अर्पण करा असेंहि तुम्हांला तो सांगत नाही. यांपैकी प्रत्येक योगाची आपल्याला अशी शिकवण आहे की तर्कबुद्धीचें अनुसरण करा, तिलाच चिकटून राहा. ज्ञानाचीं तीन साधनें सर्वांना उपलब्ध आहेत असें आपल्याला आढळतें. पहिलें साधन म्हणजे सहजप्रवृत्ति. पशुपक्ष्यांच्या ठिकाणीं या प्रवृत्तीचा विशेष विकास दिसून येतो. ज्ञानाच्या साधनांपैकी हें सर्वांत खालच्या प्रतीचें साधन होय. ज्ञानाचें दुसरें साधन कोणतें ? तें म्हणजे तर्कबुद्धि. मानवाच्या ठिकाणीं हिचा विशेष विकास झालेला आहे. आपण प्रथमत: हें लक्षांत ठेवावयास हवें की सहजप्रवृत्ति हें फार अपुरें साधन आहे. पशुपक्ष्यांचें कार्यक्षेत्र फारच मर्यादित असतें आणि या मर्यादित क्षेत्रांत सहजप्रवृत्ति कार्य करते. जेव्हा आपण मानवाकडे वळतों, तेव्हा या सहजप्रवृत्तीचें तर्कबुद्धींत बहुतांशीं रूपांतर झालेलें आपल्याला आढळतें. मानवाचें कार्यक्षेत्रहि विस्तृत असलेलें आपल्याला दिसून येतें. तरीपण तर्कबुद्धिदेखील फार अपुरी पडते. तर्कबुद्धि ही एका विशिष्ट मर्यादेपर्यंत जाऊन थांबते, व ती कांहीकेल्या पुढे जाऊं शकत नाही. आणि जर आपण ही तर्कबुद्धि ह्यापुढे चालविण्याचा प्रयत्न केला तर त्यामुळे भयंकर गोंधळ निर्माण होतो व तर्कबुद्धिच तर्कविरोधी होऊन जाते. न्यायशास्त्राच्या भाषेंत सांगायचें म्हणजे या तर्कबुद्धींत अन्योन्याश्रयदोष (argument in a circle) येतो. जडद्रव्य आणि शक्ति हा जो आपल्या अनुभवाचा पाया आहे त्याचेंच उदाहरण घेऊं. जडद्रव्य म्हणजे काय ? ज्याच्यावर शक्तीची क्रिया घडते तें द्रव्य. पण शक्ति म्हणजे तरी काय ? जडद्रव्यावर क्रिया करणारी ती शक्ति. ही गुंतागुंत लक्षांत घ्या.

नैयायिक यालाच 'अन्योन्याश्रयदोष' असें म्हणतात. पहिली कल्पना दुसरीवर अवलंबून, तर दुसरी पहिलीवर. तर्कबुद्धीच्या मार्गांत दुर्गम अशी भिंत उभी आहे, आणि तिच्या पलीकडे तर्कबुद्धि जाऊं शकत नाही असें आपल्याला आढळून येतें. तरीपण पलीकडील अनंताच्या राज्यांत संचार करण्यासाठी ही तर्कबुद्धि नेहमी उतावीळ झालेली असते. हें इंद्रियगोचर विश्व, किंवा मनाला ज्ञात होणारें हें विश्व म्हणजे त्या अनंत सत्तेचा आपल्या जाणिवेच्या पातळीवर व्यक्त झालेला अत्यंत अल्प असा अंश आहे; जाणिवेच्या मर्यादित क्षेत्रांतच तर्कबुद्धि कार्य करीत असते, तिला त्यापलीकडे जातां येत नाही. यासाठी या जाणिवेच्या पलीकडे आपल्याला नेऊं शकेल अशा दुसऱ्या एका साधनाची आवश्यकता आहे, आणि हें साधन म्हणजे अंतःस्फूर्ति वा अपरोक्षानुभूति हें होय. अशा रीतीने सहजप्रवृत्ति, तर्कबुद्धि व अंतःस्फूर्ति हीं ज्ञानाचीं तीन साधनें होत. पशुपक्ष्यांमधे सहजप्रवृत्ति विद्यमान असते, मानवामधे तर्कबुद्धि दिसून येते, तर देवमानवांमधे अंतःस्फूर्ति आढळून येते. परंतु सर्व माणसांच्या ठिकाणीं ज्ञानाच्या ह्या तिन्हीं साधनांचीं बीजें, कमीअधिक प्रमाणांत विकसित झालेलीं आढळून येतात. या तिन्ही मानसिक शक्तींचा विकास होण्यासाठी त्या बीजरूपाने आधीच विद्यमान असल्या पाहिजेत हें उघड आहे. आणि त्याचबरोबर ही गोष्टदेखील ध्यानांत धरायला पाहिजे की यांपैकी एक शक्ति ही दुसरीचें विकसित रूप आहे व म्हणून त्या परस्परविरोधी नाहीत. तर्कबुद्धिच विकसित होऊन अंतःस्फूर्तींत परिणत होते आणि म्हणून अंतःस्फूर्ति ही तर्कबुद्धीला विरोधी नाही, तर ती बुद्धीला पूर्णता आणते. ज्या गोष्टी तर्कबुद्धीने आकळतां येत नाहीत त्या

अंत:स्फूर्तीच्या साहाय्याने स्पष्ट होतात आणि त्या तर्कबुद्धीला विरोधी नसतात. वृद्ध मनुष्य हा लहान मुलाला विरोधी नसतो तर तो लहान मुलाचेंच परिणत स्वरूप असतो. म्हणून खालच्या प्रतीच्या साधनाला उच्च प्रतीचें साधन समजण्याची जी चूक केली जाते त्यांत भयंकर धोका आहे. ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. अनेकदा सहजप्रवृत्ति हीच अंत:स्फूर्ति म्हणून जगापुढे मांडली जाते आणि मग 'मी भविष्यद्रष्टा आहें' असे खोटे दावे पुढे मांडले जातात! एखाद्या मूर्ख वा अर्धवट माणसाला असें वाटूं लागतें की त्याच्या डोक्यांत जो गोंधळ सुरू आहे तीच अंत:स्फूर्ति होय. आणि इतर माणसांनी आपलें अनुसरण करावें अशी त्याची इच्छा असते. या जगांत परस्परविरोधी, तर्कदुष्ट अशा ज्या मूर्खपणाच्या गोष्टी प्रचारित होत असतात त्या म्हणजे अर्धवट माणसाच्या गोंधळलेल्या डोक्यांतून बाहेर पडलेले सहजप्रवृत्तिजन्य प्रलाप होत. आणि हे प्रलाप म्हणजे अंत:स्फूर्तीची भाषा होय असें भासविण्याचे प्रयत्न केले जातात.

खऱ्या शिकवणीची पहिली कसोटी ही आहे की ती तर्कबुद्धीला विरोधी असतां कामा नये. उपर्युक्त सर्व योग हे याच पायावर आधारलेले आहेत असें आपल्याला आढळून येईल. प्रथम आपण राजयोग विचारांत घेऊं. हा मानसशास्त्रीय योग आहे. ऐक्याकडे जाण्याचा हा मानसशास्त्रीय मार्ग आहे. हा विषय फार व्यापक आहे. या योगाची केवळ मध्यवर्ती कल्पनाच फक्त मी आता देऊं शकेन. ज्ञान मिळविण्याचा एकच उपाय आपल्याला उपलब्ध आहे. कनिष्ठ दर्जाच्या माणसापासून तों सर्वोच्च योग्यापर्यंत सर्वांना हाच उपाय अमलांत आणावा लागतो, आणि तो म्हणजे मनाची एकाग्रता हा होय. आपल्या प्रयोगशाळेमधे काम

करणारा रसायनशास्त्रज्ञ आपल्या साऱ्या मानसिक शक्ति एकत्रित करतो, केंद्रीभूत करतो व मूलतत्त्वांवर त्या प्रयुक्त करतो. त्यामुळे मूलतत्त्वांचें पृथक्करण होतें व अशा रीतीने रसायनशास्त्रज्ञाला ज्ञान प्राप्त होतें. खगोलशास्त्रज्ञहि आपल्या मनाच्या शक्ति एकत्रित करतो, केंद्रीभूत करतो व दुर्बिणीच्या साहाय्याने विभिन्न ग्रहांवर त्या प्रयुक्त करतो, आणि मग ग्रहमाला, तारे हे आपापलें सारें रहस्य त्याच्यासमोर प्रकट करतात. प्राध्यापक असो की विद्यार्थी असो की ज्ञान प्राप्त करूं इच्छिणारा दुसरा कोणीहि असो, प्रत्येकाला याच उपायाचा अवलंब करावा लागतो. आपण माझें भाषण ऐकत आहांत. माझे शब्द आपणांस आवडले तर आपलें मन त्यांच्यावर एकाग्र होईल आणि घड्याळाचा ठोका जरी पडला तरी या एकाग्रतेमुळे तो आपणांस ऐकूं येणार नाही. आणि तुम्ही आपलें मन जितकें जधिक एकाग्र करूं शकाल तितकें अधिक मी काय म्हणतों हें आपल्याला कळेल. माझ्या ठिकाणची प्रेमभावना आणि शक्ति मी जितकी एकाग्र करीन तितकें आपल्याला मला जें सांगायचें आहे तें मी अधिक चांगल्या रीतीने व्यक्त करूं शकेन. एकाग्रता जितकी अधिक तितकें अधिक ज्ञान प्राप्त होईल, कारण ज्ञानप्राप्तीचा हाच एकमेव उपाय आहे. चांभार जर आपलें मन एकाग्र करून आपलें काम करील तर तो जोड्यांना अधिक चांगलें पॉलिश करूं शकेल. स्वयंपाकी जर आपलें काम एकाग्र मनाने करील तर त्याचा स्वयंपाक अधिक चांगला होईल. धनार्जन असो, ईश्वरोपासना असो किंवा दुसरें कोणतेंहि कार्य असो, मनाची एकाग्रता जितकी अधिक, तितकें तें काम चांगल्या प्रकारें होईल. प्रकृतीचे दरवाजे उघडून त्यांमधून ज्ञानप्रकाशाचा स्रोत प्राप्त करून घेण्याचा हाच उपाय आहे. मनाची एकाग्रता हीच ज्ञान-

भांडाराची एकमेव किल्ली होय. राजयोगांत मुख्यतः याच विषयाचा विचार केलेला आहे. आपल्या शरीराच्या आजच्या अवस्थेंत आपलें मन शेकडो गोष्टींत विखुरलेलें असतें आणि शेकडो वस्तूंकडे धावतांना त्याची शक्ति व्यर्थ खर्च होते. जेव्हा मन शांत करण्याचा मी प्रयत्न करतों, ज्ञानाच्या एखाद्या विषयावर तें एकाग्र करण्याचा प्रयत्न करतों तेव्हा हजारो संकल्पविकल्प जोराने डोक्यांत शिरतात, अनेक विचार मनांत येतात व मन अशान्त होतें. या सर्वांचा निरोध करून मनावर ताबा कसा मिळवावा हा राजयोगाच्या अभ्यासाचा मुख्य विषय आहे.

आता आपण कर्मयोगाकडे वळूं. कर्माच्या द्वारें परमेश्वराप्रत जाण्याचा हा मार्ग आहे. समाजांत असे पुष्कळ लोक दिसून येतात की त्यांचा जन्म जणु कांही कोणतें ना कोणतें कार्य करण्यासाठी झाला आहे. त्यांचें मन केवळ विचारजगतांत स्थिर होऊं शकत नाही. दृश्यमान वा मूर्त स्वरूपांत असलेलें कार्यच त्यांना कळूं शकतें. अशा प्रकारच्या लोकांसाठी सुद्धा जीवनाचें एक शास्त्र असायला पाहिजे. आपल्यापैकी प्रत्येकजण कांही ना कांही कार्यांत गुंतलेला आहे. परंतु कर्माचें रहस्य बरोबर न समजल्यामुळे आपल्यापैकी पुष्कळजणांच्या क्रिया-शक्तीचा बराचसा भाग वाया जातो. कर्मयोग हें रहस्य आपल्याला समजावून सांगतो. कर्म कुठे व कसें करावें, आपल्या क्रियाशक्तीचा जास्तींत जास्त भाग उपयोगांत कसा आणावा, आपल्या कार्यांत त्याचा जास्तींत जास्त सदुपयोग कसा करावा हें कर्मयोग शिकवितो. कर्माचें हें रहस्य समजून घेतांना, कर्मा-विरुद्ध जो एक महत्त्वाचा आक्षेप घेण्यांत येतो त्याचाहि आपण विचार करायला पाहिजे कर्म हें दुःखकारक आहे हाच तो

आक्षेप होय. आसक्ति ही सर्व दुःखांची जननी आहे. मला कर्म करावेंसें वाटतें. एखाद्या माणसाचें भलें करावें असें मला वाटतें. आणि ज्या माणसाला मी मदत करतों तो बहुधा कृतघ्न होऊन माझ्या विरुद्ध जातो व परिणामीं मला दुःख होतें. अशा गोष्टीं-मुळे मानवाला कर्म करावेंसें वाटत नाही. दुःखाच्या या भीती-मुळे मानवाच्या कार्यांचा व क्रियाशक्तीचा बराचसा भाग नष्ट होतो. कोणाला मदत करीत आहोंत, कशासाठी मदत करीत आहोंत याकडे लक्ष न देतां अनासक्त होऊन कर्मासाठी कर्म कसें करावें हें कर्मयोग शिकवितो. कर्मयोगी कर्म करीत असतो, कारण तो त्याचा स्वभावच असतो; असें करणें हें चांगलें आहे अशी त्याची भावना असते; याच्या पलीकडे त्याचा कांही हेतु नसतो. या जगांत त्याची भूमिका दात्याची असते. कांही मिळवावें असें त्याला कधीच वाटत नाही. फक्त देणेंच त्याला माहीत असतें. परतफेड म्हणून तो कांही मागत नाही. आणि म्हणून तो दुःखाच्या तावडींत सापडत नाही. जेव्हा जेव्हा आपण दुःखाच्या कचाटयांत सापडतों तेव्हा तेव्हा समजावें की तो 'आसक्ती'च्या प्रतिक्रियेचा परिणाम आहे.

यानंतर आपण भक्तियोगाचा विचार करूं. भावनाशील व प्रेम इच्छिणाऱ्या व्यक्तीसाठी हा भक्तियोग आहे. असा माणूस ईश्वरावर प्रेम करूं इच्छितो. विविध प्रकारचीं अनुष्ठानें, फुलें, धूपदीप, सुंदर इमारती, मूर्ति इत्यादींचा तो अवलंब करतो व त्यांचें तो साहाय्य घेतो. त्याचें हें करणें चुकीचें आहे असें तुम्हांला म्हणावयाचें आहे काय ?एक खरी गोष्ट मी तुम्हांला सांगतों. ती तुम्ही, विशेषतः या देशांतील लोकांनी लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे. ती गोष्ट ही की ज्या धर्मसंप्रदायांत पुराणें व नाना

प्रकारचीं अनुष्ठानें यांचें वैपुल्य आहे त्यांतच जगांतील अध्यात्म-संपन्न थोर विभूति जन्मास आल्या आहेत. ज्या धर्मपंथांनी कोणत्याहि प्रकारच्या प्रतीकांचें वा अनुष्ठानांचें साहाय्य न घेतां ईश्वरोपासना करण्याचा प्रयत्न केला आहे त्यांनी धर्मातील सारी उदात्तता व सौंदर्य हीं दोन्हीं निष्ठुरपणें नष्ट केलीं आहेत. त्यांचा धर्म म्हणजे केवळ स्वमतान्धतेचा धर्म आहे, शुष्क धर्म आहे. साऱ्या जगाचा इतिहास याला साक्षी आहे. म्हणून या धार्मिक विधींना व पुराणांना नांवें ठेवूं नका. ज्या लोकांना या गोष्टी हव्या असतील त्यांना त्या घेऊं द्या. ज्यांची इच्छा असेल त्यांना त्या घेऊं द्या. अनुचित अशा उपहासात्मक हास्याचें प्रदर्शन करून "ते मूर्ख आहेत, त्यांना त्या घेऊं द्या" असें म्हणूं नका. असें म्हणणें बरोबर नाही. आध्यात्मिक दृष्टीने ज्यांचा आश्चर्यकारक विकास झालेला आहे अशीं जीं श्रेष्ठ माणसें मीं माझ्या आयुष्यांत पाहिलीं आहेत त्या सर्वांनी या विधींच्या व अनुष्ठानांच्या साहाय्याने आपली प्रगति करून घेतली आहे. त्यांच्या चरणापाशी बसण्याची माझी योग्यता नाही. त्यांच्यावर टीका करण्याचा मला काय अधिकार ? या कल्पनांचा माणसाच्या मनावर काय परिणाम होतो, त्यांच्यापैकी मी कोणाचा स्वीकार करावा व कोणाचा त्याग करावा हें मला कसें समजणार ? एखादी गोष्ट उचित आहे की अनुचित आहे हें समजून न घेतां प्रत्येक गोष्टीवर टीका करण्याची आपल्याला सवय आहे. सुंदर स्फूर्तिदायक अशीं जीं पुराणें ज्यांना हवीं असतील त्यांना तीं वाचूं द्या; कारण भावनाशील माणूस हा सत्याच्या गूढ, जटिल व्याख्यांची पर्वा करीत नाही हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांच्या पक्षीं ईश्वर हा मूर्त स्वरूपाचा असतो, त्यांच्या पक्षीं तोच एकमेव

सत्य वस्तु असतो. ते त्याला अनुभवतात, त्याला पाहतात, ऐकतात व त्यावर प्रेम करतात. त्यांना आपला ईश्वर घेऊन राहूं द्या. तुमचा बुद्धिवादी माणूस त्यांच्या दृष्टीने मूर्ख ठरतो. एखादी सुंदर मूर्ति पाहिल्यावर ती कशाची केलेली आहे हें समजून घेण्यासाठी ती फोडणाऱ्या माणसाप्रमाणे बुद्धिवादी माणूस हा भक्ताला मूर्ख वाटतो. भक्तियोग हा भक्तांना निर्हेतुक प्रेमाची शिकवण देतो. ईश्वरावर प्रेम करणें, चांगल्या गोष्टींवर प्रेम करणें हें चांगलें आहे म्हणूनच हें प्रेम करावें, स्वर्ग, पुत्र, धन इत्यादींच्या लाभासाठी ईश्वरावर प्रेम करूं नये असें हा भक्तियोग शिकवतो. प्रेम करणें हीच प्रेम करण्याची सर्वांत मोठी परतफेड आहे—ईश्वर हा प्रेमस्वरूप आहे असें हा भक्तियोग शिकवितो. ईश्वर हा सृष्टिकर्ता, सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्व-शक्तिमान नियंता, पिता, माता आहे असें मानून त्याची भक्ति करा असें भक्तियोग शिकवितो. ज्या शब्दांनी त्याचें सर्वश्रेष्ठ स्वरूप व्यक्त करतां येईल, त्याच्या स्वरूपाविषयी मानवाला जी सर्वोच्च कल्पना करतां येईल, ते शब्द आणि ती कल्पना ही की 'ईश्वर प्रेमस्वरूप आहे.' "ज्या ज्या ठिकाणीं प्रेम आहे, त्या त्या ठिकाणीं ईश्वर आहे, त्या त्या ठिकाणीं त्याचें वास्तव्य आहे." पति जेव्हा पत्नीचें चुंबन घेतो, तेव्हा त्या चुंबनांत ईश्वर असतो. आई जेव्हा मुलाचा मुका घेते तेव्हा त्याच्यांतहि ईश्वर असतो. जेव्हा मित्र हातांत हात घालून उभे असतात तेव्हा तिथेंहि प्रेमस्वरूप ईश्वर उपस्थित असतो. जेव्हा एखादा थोर मनुष्य मानवजातीवर प्रेम करतो व तिला मदत करण्याची इच्छा करतो तेव्हा तो प्रभुच मानवाला आपल्या प्रेमाची उदार देणगी मुक्त हस्ताने देत असतो. ज्या ज्या ठिकाणीं अंतःकरणाची उदा-

रता आहे त्या त्या ठिकाणीं ईश्वरच व्यक्त होत असतो. भक्तियोगाची शिकवण ही अशी आहे.

शेवटीं आपण ज्ञानयोग्याकडे वळूं. तो तत्त्वज्ञ असून चिंतनशील असतो व ह्या दृश्यमान जगाच्या पलीकडे तो जाऊं इच्छितो. या जगांतील क्षुद्र गोष्टींनी त्याचें समाधान होत नाही. खाणें, पिणें इत्यादि दैनिक कार्यक्रमाच्या पलीकडे जाण्याची त्याची वृत्ति असते. शेकडो ग्रंथांच्या शिकवणीनें सुद्धा त्याचें समाधान होत नाही. सारीं शास्त्रेंहि त्याचें समाधान करूं शकत नाहीत हीं फक्त त्याच्यासमोर हें लहान विश्वच उभें करूं शकतात. दुसऱ्या कोणत्या गोष्टीने त्याचें समाधान होईल ? असंख्य ब्रह्मांडें देखील त्याचें समाधान करूं शकणार नाहीत. सत्यसागरांतील तो एक थेंब आहे असें त्याला वाटतें. अंतिम सत्याचें प्रत्यक्ष दर्शन घेऊन त्याच्या अंतरंगांत प्रवेश करण्यासाठी या सर्व ब्रह्मांडांच्या पलीकडे जाण्याची त्याच्या आत्म्याची धडपड असते. त्या सत्याचा साक्षात्कार व्हावा, तद्रूप व्हावें, विराट सत्तेशीं एकरूप व्हावें म्हणून ही सारी धडपड असते. ज्ञानमार्गी हा असा असतो. ईश्वराला माता, पिता, विश्वनिर्माता, रक्षणकर्ता, पथप्रदर्शक असें म्हटल्याने त्याचें स्वरूप पूर्णपणें व्यक्त होत नाही असें त्याला वाटतें. त्याच्या दृष्टीने ईश्वर हा त्याच्या प्राणाचा प्राण, आत्म्याचा आत्मा असतो. त्याच्या दृष्टीने ईश्वरच त्याचा आत्मा असतो. त्याच्या पक्षीं ईश्वराव्यतिरिक्त दुसरें कांहीच अस्तित्वांत नसतें. तत्त्वज्ञानाच्या जबरदस्त आघातांनी त्याच्या सर्व नश्वर अंशांचें चूर्ण होऊन तें उडून जातें. सरतेशेवटीं खरोखरी जें उरतें तें म्हणजे ईश्वरच होय.

एकाच झाडावर दोन पक्षी आहेत--एक शेंड्यावर व

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३३८९५ वि: १८।८।८-३३
क्रमांक २४१०८ नों दि: २४-११-६३

दुसरा खाली. शेंड्यावर बसलेला पक्षी शांत, स्तब्ध, गंभीर आणि आपल्याच महिम्यांत लीन असा आहे. खालच्या फांदीवर बसलेला पक्षी आळीपाळीने कडू व गोड फळें खात आहे, या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारीत आहे, व आळीपाळीने सुखदुःख भोगीत आहे. कांही वेळाने हा खालच्या फांदीवरील पक्षी एक अत्यंत कडू फळ खातो, त्याला स्वतःचा तिटकारा येतो व तो वर पाहतो. त्याला दुसरा पक्षी दिसतो. या वरच्या पक्ष्याचा सुंदर सोनेरी पिसारा असतो, तो कडू किंवा गोड कोणतेंच फळ खात नाही, त्याला सुख किंवा दुःख दोन्ही नाही. तो शांत, आत्मनिष्ठ असून त्याला स्वतःच्या आत्म्यावांचून कांहीच दिसत नाही. खालच्या फांदीवरील पक्षी ही अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी व्याकुळ होतो. पण त्याला लगेच विस्मरण होतें व पुनः तो फळें खायला सुरवात करतो. थोड्याच वेळांत तो एक अत्यंत कडू फळ खातो. त्यामुळे तो कष्टी होतो. तो पुनः वर पाहतो आणि वरच्या पक्ष्याच्या अधिक निकट जाण्याचा प्रयत्न करतो. पुनः तो विसरतो, थोड्या वेळाने पुनः तो वर पाहतो. पुनःपुनः तो असेंच करीत राहतो. सरतेशेवटीं तो त्या सुंदर पक्ष्याच्या अगदी जवळ येतो. त्या सुंदर पक्ष्याच्या पिसाऱ्यांतून निघालेल्या प्रकाशाने आपण वेढले गेलों आहोंत असें त्याला दिसतें. आपल्यांत परिवर्तन होत आहे व आपण हळूहळू विलीन होत आहोंत असें त्याच्या अनुभवास येतें. तो त्या सुंदर पक्ष्याच्या आणखी जवळ जातो. त्याच्या भोवतालचें सर्वकांही विलीन होऊन जातें आणि शेवटीं या आश्चर्यकारक परिवर्तनाचा अर्थ त्याला कळून येतो. खालच्या फांदीवरील पक्षी हा वरच्या पक्ष्याची घनीभूत छाया वा प्रतिबिंब होतें. वस्तुतः तो स्वतः सर्वकाल वरचाच पक्षी होता. खालच्या फांदीवरील पक्षी, त्याचें

कडू-गोड फळें खाणें, त्याचें आळीपाळीने सुखदुःख भोगणें हें केवळ मिथ्या होतें, स्वप्नमय होतें. खरें पाहतां तो शांत, स्तब्ध, महिमाशाली, ऐश्वर्यशाली, दुःख-शोकाच्या पलीकडे असलेला असा वरचा पक्षीच सर्वकाल विद्यमान होता. हा वरचा पक्षी म्हणजे ईश्वर होय, या विश्वाचा स्वामी होय, आणि खालचा पक्षी म्हणजे जीवात्मा असून तो या जगांतील कडू-गोड फळें चाखत असतो. मधून मधून या जीवात्म्यावर प्रबल आघात होतात. कांही काळ फळें खाणें बंद करून तो त्या अज्ञात ईश्वराच्या दिशेने पुढे जातो आणि त्याच्या हृदयांत ज्ञानाचा प्रकाश पडतो. हें जग म्हणजे एक मिथ्या देखावा आहे, असें त्याला वाटतें. परंतु इंद्रियें पुनः त्याला खाली ओढतात आणि या जगांतील कडू-गोड फळें खायला तो पुनः सुरवात करतो. पुनः त्याच्यावर अत्यंत जोरदार आघात होतो. त्याच्या अंतःकरणांत पुनः दिव्य प्रकाश पडतो. अशा रीतीने हळूहळू तो ईश्वराप्रत जातो. तो जसजसा जवळ येत जातो तसतसा त्याचा जुना 'अहं' विलीन होत आहे असें त्याच्या प्रत्ययास येतें. तो जेव्हा अगदी जवळ येतो, तेव्हा आपण ईश्वराहून भिन्न नाही हें त्याला दिसून येतें. आणि त्याच्या तोंडून उद्गार निघतात, "विश्वात्मा म्हणून ज्याचें तुमच्यासमोर मीं वर्णन केलें, अणूपरमाणूंत व चंद्रसूर्यांत ज्याचा वास आहे असें मीं सांगितलें तो आपल्या जीवनाचा आधार आहे, आपल्या आत्म्याचा आत्मा आहे. इतकेंच नव्हे, तर 'तूं तोच आहेस'-- तत्त्वमसि." ज्ञानयोगाची शिकवण ही अशी आहे. मनुष्य स्वरूपतः ईश्वर आहे असें हा योग सांगतो. जीव-शिवाच्या ऐक्याचें, विश्वांतील सर्व जीवांच्या खऱ्या ऐक्याचें तो मानवाला दर्शन घडवितो आणि आपल्यापैकी प्रत्येकजण हा त्या ईश्वराचेंच या

जगांतील व्यक्त रूप आहे हें तो दाखवून देतो. आपल्या पायाखाली सरपटणाऱ्या यःकश्चित् किड्यापासून तों आपण ज्यांच्याकडे आश्चर्ययुक्त श्रद्धेने व आदराने पाहतों त्या सर्वश्रेष्ठ विभूतींपर्यंत आपण सर्वजण त्या ईश्वराचींच व्यक्त रूपें आहोंत.

शेवटीं, मला एक गोष्ट सांगायची आहे. हे विविध योग-मार्ग प्रत्यक्ष आचरणांत आणणें आवश्यक आहे. त्यांच्याविषयी केवळ तात्त्विक चर्चा करून कांहीच निष्पन्न होणार नाही. प्रथम आपण त्यांच्याविषयी श्रवण करावयास हवें व मग त्यांचें मनन करावयास हवें; आपण त्यांचा विचार करायला पाहिजे, ते विचार आपल्या मनावर बिंबविले पाहिजेत; आपण त्यांचें ध्यान करायला पाहिजे, त्यांचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायला पाहिजे; तरच शेवटीं ते आपल्या जीवनाशीं एकरूप होतील. असें झाल्यास धर्म म्हणजे केवळ कांही कल्पनांचा किंवा कांही सिद्धान्तांचा समुच्चय राहणार नाही किंवा तो केवळ बौद्धिक संमतीचा विषय राहणार नाही, तर तो आपल्या अगदी अंतर्यामीं प्रवेश करील. आज अनेक मूर्खपणाच्या गोष्टींना आपली बौद्धिक संमति देऊन कदाचित् आपण त्यांचा स्वीकार करूं, आणि लगेच दुसऱ्या दिवशीं आपलें मत कदाचित् पार बदलून जाईल. परंतु खरा धर्म कधीच बदलत नाही, त्यांत परिवर्तन होत नाही. धर्म म्हणजे प्रत्यक्ष अनुभूति होय. धर्म म्हणजे बडबड नव्हे, मतवाद नव्हे, सिद्धान्त नव्हे--मग ते कितीहि सुंदर असोत. आत्मा हा ब्रह्मस्वरूप आहे हें जाणून तद्रूप होणें, त्याचा साक्षात्कार करून घेणें म्हणजेच धर्म होय. धर्म ही केवळ ऐकण्याची किंवा बौद्धिक संमति देण्याची वस्तु नाही. ज्या सत्यावर आपला विश्वास आहे त्याच्याशीं आपल्या आत्म्याचें एक-रूप होऊन जाणें म्हणजेच धर्म होय, आणि हाच खरा धर्म होय.

# सार्वजनीन धर्म प्रत्यक्षांत आणण्याचा मार्ग

(२८ जानेवारी १९०० रोजीं कॅलिफोर्नियामधील पॅसाडेना येथील युनिव्हरसॅलिस्ट चर्चमधे दिलेलें व्याख्यान.)

ज्या अनुसंधानामुळे आपल्याला ईश्वराचें ज्ञान लाभतें त्या अनुसंधानाहून मानवी हृदयाला दुसरी कोणतीहि गोष्ट अधिक प्रिय वाटत नाही. प्राचीन वा अर्वाचीन कालांत आत्मा, ईश्वर आणि मानवाचें अंतिम भवितव्य या विषयांचा अभ्यास करण्यांत मानवाची जितकी शक्ति खर्च झालेली आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि विषयाचा अभ्यास करण्यांत खर्च झालेली नाही. आपले दैनंदिन व्यवहार, आपल्या आशा-आकांक्षा, आपलीं रोजचीं कामें, आणि फार गंभीर स्वरूपाचा असा आपला जीवनकलह, या सर्वांमधे आपण कितीहि गढून गेलेलों असलों तरी आपल्या जीवनांत असा एक क्षण निश्चित येतो की ज्या वेळीं या साऱ्या ऐहिक गोष्टींचा विचार एकदम थांबतो, आणि या जगताच्या पलीकडे काय आहे हें जाणून घेण्याचा मन प्रयत्न करूं लागतें. कधी कधी इंद्रियांच्या पलीकडे असलेल्या राज्याचें मनाला ओझरतें दर्शन होतें, आणि त्यामुळे त्या राज्याची प्राप्ति करून घेण्यासाठी मन प्रयत्न करूं लागतें. सर्व देशांत, सर्व कालीं मानवी मनाचा हा प्रयत्न चालू आहे. या विश्वाच्या पलीकडे काय आहे हें जाणण्याची उत्सुकता माणसाला लागलेली असते आणि तो स्वतःला विशाल बनविण्याचा प्रयत्न करीत असतो; आणि ज्याला आपण विकास किंवा प्रगति असें नांव देतों तिचें मोजमापसुद्धा ईश्वरानुसंधान अथवा मानवी भवितव्याचें अनुसंधान या एकाच मापदंडाने सर्वदा होत आलें आहे.

निरनिराळ्या देशांमधे निरनिराळ्या सामाजिक संघटनांमधून ज्याप्रमाणे मनुष्याची सामाजिक प्रगतीसाठी धडपड दिसून येते, त्याचप्रमाणे विभिन्न धर्मांमधून आध्यात्मिक प्रगतीसाठी मनुष्याची धडपड दिसून येते. आणि ज्याप्रमाणे विभिन्न समाजांमधे सतत विरोध वा द्वंद्व सुरू असतें त्याचप्रमाणे या निरनिराळ्या धर्मसंप्रदायांमधेसुद्धा सर्वदा विरोध वा भांडण चालूं असतें. एखाद्या विशिष्ट समाजांतील लोकांचा असा दावा असतो की जगण्याचा अधिकार फक्त त्यांनाच काय तो आहे. आणि दुबळ्यांना पायदळीं तुडवून शक्य तोंवर आपल्या या हक्काची अंमलबजावणी करण्याचा त्यांचा प्रयत्न चालूं असतो. आपल्याला माहीतच आहे की अशाच प्रकारचा एक भयंकर संघर्ष सध्या दक्षिण आफ्रिकेमधे सुरू आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक धर्मपंथ असा दावा करीत आला आहे की जगण्याचा अधिकार फक्त त्यालाच आहे, इतरांना नाही. म्हणून, धर्मामुळे मानवाला जेवढी सुख-शांति लाभली आहे तेवढी दुसऱ्या कशानेंहि लाभलेली नाही हें जरी खरें असलें तरी याबरोबरच हेंहि खरें आहे की धर्मामुळे मानवाला जेवढें दुःख वा यातना भोगाव्या लागल्या आहेत तेवढ्या दुसऱ्या कशामुळेहि भोगाव्या लागल्या नाहीत. जगांत शांतता व प्रेम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न धर्माने जितका केला तितका दुसऱ्या कोणींहि केलेला आहे असें म्हणतां येणार नाही; त्याचप्रमाणे धर्माने जेवढी भयंकर विद्वेषाची भावना चेतविलेली आहे तेवढी दुसऱ्या कोणींहि चेतविलेली नाही. मानवामानवामधे धर्माने जेवढा भ्रातृभाव प्रस्थापित केला आहे तेवढा दुसऱ्या कोणींहि केलेला नाही; त्याचप्रमाणे मानवामानवामधे कट्टर शत्रुत्वाची भावना जर कोणीं निर्माण केली असेल तर तीहि धर्मानेच होय. धर्माने

जितक्या लोकोपयोगी संस्थांना जन्म दिला, रुग्णालयें स्थापन केलीं, जनावरांसाठीसुद्धा दवाखाने घातले तितके दुसऱ्या कोणींहि घातलेले नाहीत; त्याचप्रमाणे धर्मामुळे जितके रक्ताचे महापूर या जगांत वाहिले तितके दुसऱ्या कशामुळेहि वाहिलेले नाहीत. हें सगळें खरें असूनहि आपल्याला माहीत आहे की विचारांचा एक अंत:प्रवाह सतत वाहत आहे; कांही सुज्ञ माणसें, तत्त्वज्ञ, धर्माचा तौलनिक अभ्यास करणारे अभ्यासक या सर्वांनी परस्परविरोधी अशा धर्मपंथांमधे एक प्रकारचा समन्वय आणि सुसंवादित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला व तसा त्यांचा प्रयत्न आजहि चालूं आहे. कांही विशिष्ट देशांच्या बाबतींत हे प्रयत्न यशस्वी झालेले आहेत खरे, पण सर्व जगाच्या दृष्टीने विचार केला तर ते निष्फळ ठरलेले आहेत.

अतिप्राचीन काळापासून अस्तित्वांत असलेल्या कांही धर्मांत अशी भावना दिसून येते की सर्व संप्रदाय जिवंत राहावेत; त्यांच्या मतें प्रत्येक संप्रदायाला एक विशिष्ट अर्थ आहे, प्रत्येक संप्रदायांत कोणता ना कोणता महान् भाव निहित आहे, आणि त्यासाठीच जगाच्या हिताच्या दृष्टीने त्या संप्रदायाची गरज असल्यामुळे त्याला साहाय्य करणें हें आपणां सर्वांचें कर्तव्य आहे. अर्वाचीन कालांत हाच विचार अधिकाधिक प्रभावी होत असून तो प्रत्यक्ष आचरणांत आणण्याचे प्रयत्न वेळोवेळीं करण्यांत येत आहेत. हे सारे प्रयत्न आपल्या अपेक्षेप्रमाणे नेहमीच यशस्वी होतात वा ते पुरेसे कार्यक्षम असतात असें नाही. उलट, आपण अधिक असहिष्णु बनून अधिक भांडण करीत असतों असें दृश्य कधी कधी पाहून आपल्या पदरीं फार निराशा मात्र येते.

स्वधर्माविषयीचा वृथा अभिमान व अभिनिवेश बाजूला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ............ विः ............
क्रमांक ............ नोंद दि ............


ठेवून अगदी सर्वसामान्य माणसाच्या दृष्टिकोनांतून जर आपण पाहूं लागलों तर आपल्याला प्रथमतः असें आढळून येईल की, जगांतील सर्व महान् धर्मांमधे फार मोठी जीवनशक्ति आहे. कित्येक लोक यावर असें म्हणतील की ही गोष्ट आम्हांला माहीत नाही; पण अज्ञान ही कांही उचित सबब नव्हे. समजा, एखादा मनुष्य असें म्हणूं लागला की, बाह्य जगांत जें काय चाललेलें आहे तें मला माहीत नाही म्हणून बाह्य जगांतील वस्तूंचें अस्तित्वच नाही, तर त्या माणसाचें म्हणणें कोण कसें ऐकून घेईल ? आपल्यापैकी ज्यांनी ज्यांनी जगांतील धार्मिक विचारांची दिशा बारकाईने पाहिलेली आहे, तिचें सूक्ष्म निरीक्षण केलेलें आहे त्यांना ही गोष्ट पूर्णपणें कळून चुकलेली आहे की जगांतील कोणताहि महान् धर्म अजून नष्ट झालेला नाही; इतकेंच नव्हे, तर प्रत्येक धर्माचा विकास होत आहे, तो प्रगति करीत आहे. ख्रिस्ती धर्माच्या व इस्लाम धर्माच्या अनुयायांची संख्या सारखी वाढत आहे; हिंदु धर्माची प्रगति होत आहे. यहुदी लोकांची संख्या वाढत आहे आणि ते लोक सर्व जगभर पसरत चालल्यामुळे यहुदी धर्माचा सारखा विस्तार होत आहे.

जगांतील फार पुरातन व थोर असा एकच धर्म आहे की ज्याच्या अनुयायांची संख्या अत्यंत कमी झालेली आहे. हा धर्म म्हणजे प्राचीन इराणी लोकांचा झरतुष्ट्र धर्म होय. मुसलमानांनी इराणचा पाडाव केल्यावर या धर्माच्या सुमारें एक लाख लोकांनी भारतांत येऊन आश्रय घेतला आणि कांही लोक इराणमधेच राहिले. परंतु मुसलमानांच्या सततच्या धार्मिक छळामुळे, जे इराणमधे राहिले त्यांची फारच वाताहात झाली व आज या धर्माचे फारतर दहा हजार लोक तेथे उरले आहेत. भारतामधे

त्यांची संख्या सुमारें ऐंशी हजार आहे; पण त्यांच्या संख्येंत वाढ होत नाही. याला मुळांत असें एक कारण असूं शकेल की हे लोक दुसऱ्या धर्मांतील लोकांना स्वधर्मांत ओढीत नाहीत. ही एक मूळची खरी अडचण आहे, आणि दुसरी गोष्ट अशी की भारतांतील ह्या अल्पसंख्य लोकांमधे जी चुलत-मावस भावंडांबरोबर विवाह करण्याची एक अनिष्ट प्रथा आहे तिच्यामुळेहि या लोकांची संख्या वाढत नाही. हा एक अपवाद सोडला तर सर्व मोठाले धर्म आज जिवंत आहेत, ते वाढत आहेत व त्यांचा प्रसार होत आहे. या ठिकाणीं एक गोष्ट आपण लक्षांत घ्यायला हवी; ती ही की जगांतील सर्व मोठे धर्म हे फार प्राचीन आहेत. अर्वाचीन काल-खंडांत त्यांच्यापैकी एकाहि धर्माची स्थापना झालेली नाही. आणि जगांतील प्रत्येक धर्माचा उगम गंगा आणि युफ्रेटिस या दोन नद्यां-मधील प्रदेशांत झालेला आहे. युरोपमधे किंवा अमेरिकेमधेसुद्धा एकाहि मोठ्या धर्माचा उगम झालेला नाही. आशिया ही प्रत्येक धर्माची जननी असून जगाच्या या खंडांतच प्रत्येक धर्माची स्थापना झालेली आहे. आधुनिक शास्त्रज्ञांच्या मताप्रमाणे क्रमविकास-वादाचा असा सिद्धान्त आहे की जे जीव जगण्याला अधिक लायक वा पात्र असतात तेच या जीवनकलहांत टिकून राहतात. आणि हाच पात्रतेचा निकष जर सर्व धर्मांना लावला तर, ज्याअर्थी हे धर्म अजून टिकाव धरून आहेत त्याअर्थी ते अद्याप कांही लोकांना उपयुक्तच आहेत असें सिद्ध होतें. हे धर्म कायम आहेत ह्याचें कारण हें की त्यांच्यामुळे अनेकांचें हित साधतें. दक्षिण आशियाच्या कांही भागांत मुसलमानांचा प्रसार कसा होत आहे तो पाहा. आफ्रिकेंत तर त्या धर्माचा प्रसार फारच जोरदारपणें चालूं आहे. बौद्ध धर्माचे अनुयायी मध्य आशियांत सतत पसरत

आहेत. यहुदी लोकांप्रमाणे हिंदु लोक दुसऱ्यांचें धर्मांतर करीत नाहीत. असें असूनहि इतर वंशांचे लोक हळूहळू हिंदु धर्मांत प्रवेश करीत आहेत, आणि त्यांच्याशीं मिसळून त्यांच्या पातळीवर येत आहेत. हिंदूंच्या कितीतरी परंपरा, चालीरीती त्यांनी उचललेल्या आहेत. आपणां सर्वांना माहीतच आहे की ख्रिस्ती धर्माचा प्रसार होत आहे. या कामीं त्यांची जितकी शक्ति खर्च होत आहे त्या मानाने त्यांना यश लाभत आहे किंवा नाही याबद्दल मात्र मला खात्री देतां येत नाही. ख्रिस्ती लोकांच्या प्रचाराच्या प्रयत्नामधे एक मोठा दोष आहे. आणि सर्वच पाश्चात्त्य संस्थांमधे हा दोष दिसून येतो. तो म्हणजे शेकडा नव्वद टक्के शक्ति प्रचाराच्या साधनांमधे खर्च होऊन जाते, तिकडे यंत्र-तंत्रावर अत्यधिक भर देण्यांत येत असतो. धर्मप्रचार हें आशिया खंडांतील लोकांचेंच राखीव कार्य असत आलें आहे. पाश्चात्त्य लोकांनी संघटना, सामाजिक संस्था, लष्कर, शासन या बाबतींत डोळे दिपविणारी कामगिरी केलेली आहे. पण धर्मप्रचाराच्या बाबतींत आशियांतील लोकांची ते कदापि बरोबरी करूं शकणार नाहीत, कारण आशियावासी सतत धर्मप्रचार करीत आलेले आहेत व त्याची त्यांना पुरेपूर माहिती आहे. यांत्रिकतेवर ते विशेष भर देत नाहीत.

यावरून दिसून येतें की, मानवाच्या इतिहासांतील हें एक सत्य आहे की हे सर्व धर्म अजून जिवंत आहेत आणि त्यांचा प्रसार व वाढ होत आहे. आणि याला एक निश्चित अर्थ आहे. सर्वज्ञ, कृपासागर, सृष्टिकर्त्या परमेश्वराची जर अशी इच्छा असती की या सर्व धर्मांपैकी एकच फक्त जिवंत राहावा आणि बाकीचे सर्व नष्ट व्हावेत, तर ही गोष्ट यापूर्वीच कितीतरी आधी घडून आली असती. त्याचप्रमाणे या सर्व धर्मांपैकी जर एकच धर्म सत्य व

बाकी सर्व धर्म असत्य असते तर त्या खऱ्या धर्माने एव्हाना सर्व जग व्यापून टाकलें असतें. पण वस्तुस्थिति तशी नाही. कोणत्याहि एका धर्माने सर्व जग व्यापलेलें नाही. सर्व धर्मांची कित्येकदा भरभराट वा प्रगति झालेली आहे, तर कित्येकदा त्यांची पीछेहाट वा अवनति झालेली आहे. आता पुढील गोष्टीचा विचार करा. या तुमच्या देशामधे सहा कोटीच्या वर लोक आहेत. त्यांच्यापैकी दोन कोटी दहा लक्षच फक्त या ना त्या धर्माचे अनुयायी आहेत. याचा अर्थ असा की धर्माची प्रगति सतत चालू असते असें नाही. आपण आकडे गोळा केले तर आपल्याला बहुधा असें आढळून येईल की प्रत्येक देशांत कांही वेळेला धर्माची प्रगति होते तर कित्येकदा तो खालावत जातो. एकेका धर्मांतून अनेक पंथ सारखे निर्माण होत आहेत. आपल्याच एका धर्मामधे सर्व सत्य सामावलेलें आहे, आपलाच धर्म तेवढा खरा, व हें सारें सत्य परमेश्वराने एका विशिष्ट ग्रंथांतच सांगितलें आहे असा जर एखाद्या धर्माचा दावा असेल व तो खरा असेल तर स्वाभाविकच असा प्रश्न उपस्थित होतो की जगामधे हे अनेक पंथ कां निर्माण झाले ? पन्नास वर्षांच्या आंतच एकाच धर्मग्रंथाच्या आधारावर वीस पंथ उभारले जातात. परमेश्वराने सर्व सत्य कांही विशिष्ट ग्रंथांतच सांगितलें आहे असें क्षणभर मानलें तरी त्या ग्रंथांतील शब्दांवरून आपण भांडावें म्हणून कांही परमेश्वर आपल्याला ते ग्रंथ देत नाही. पण आपण ग्रंथांतील शब्दांवरून भांडतों असें आपल्याला दिसतें. त्यालाहि कारण आहे. धर्मासंबंधी सर्व सत्य ज्या ग्रंथामधे समाविष्ट केलेलें आहे असा धर्मग्रंथ जरी प्रत्यक्ष परमेश्वराने आपल्याला बहाल केला तरी त्याचा कांही उपयोग नाही, कारण तो महान् ग्रंथ कोणालाच समजणार नाही. बायबल

या धर्मग्रंथाचेंच उदाहरण घ्या आणि ख्रिस्ती धर्मामधे जे अनेक पंथ आहेत त्यांकडे पाहा. प्रत्येक पंथ त्या ग्रंथावर आपलें स्वतःचें भाष्य लादतो. इतकेंच नव्हे तर आपल्यालाच त्या ग्रंथाचा खरा अर्थ कळला असून इतरांनी केलेला अर्थ चुकीचा आहे असें तो म्हणतो. प्रत्येक धर्माची अशीच स्थिति आहे. इस्लाम आणि बौद्ध या धर्मांत पुष्कळ पंथ आहेत, हिंदु धर्मामधे तर शेकडो पंथ आहेत. या साऱ्या गोष्टी आपल्यापुढे मांडून मला आपणांस हें दाखवावयाचें आहे की धर्माच्या क्षेत्रांत संपूर्ण मानवजातीला एकाच पद्धतीने विचार करावयास लावण्याचा आतापर्यंत जो जो प्रयत्न झाला तो तो अयशस्वी ठरला व पुढेहि असा प्रयत्न कधीच यशस्वी होणार नाही. आजसुद्धा एखाद्याने नवीन मत सुरू केलें तर त्याला असें आढळून येईल की तो आपल्या अनुयायांपासून वीस मैल दूर जातांच त्याचे अनुयायी निरनिराळे वीस संप्रदाय स्थापन करतात. आणि हें असें सदैव चाललेलें आहे ही गोष्ट आपल्याला दिसून येईल. तुम्ही सर्व माणसांना एकाच प्रकारचे विचार मानावयास लावूं शकणार नाही. ही वस्तुस्थिति आहे. आणि ती तशी आहे याबद्दल मी परमेश्वराला धन्यवाद देतों. कोणत्याहि धर्मपंथाच्या मी विरुद्ध नाहीं. अनेक पंथ अस्तित्वांत आहेत याबद्दल मला आनंद वाटतो आणि त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत राहावी अशीच माझी इच्छा आहे. याचें कारण विचाराल तर तें असें आहे : तुम्ही, मी आणि या ठिकाणीं जमलेलीं सर्व माणसें जर एकाच प्रकारचे विचार करूं लागलीं तर विचार करण्यासाठी आपल्याजवळ कांहीच शिल्लक उरणार नाही. आपल्याला माहीत आहे की गतीच्या निर्मितीसाठी दोन वा अधिक शक्ति परस्परावर आद-

ळणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विचारांचा संघर्ष वा त्यांची विभिन्नता यांमुळेच नवीन विचार उद्‌भवतात. आपण सर्वजण जर सारखाच विचार करूं लागलों तर वस्तुसंग्रहालयांतील इजिप्तच्या 'ममीं'प्रमाणे (मसाला भरून ठेवलेल्या मृत शरीरां-प्रमाणे) आपण एकमेकांकडे शून्य दृष्टीने पाहत राहूं. याहून अधिक आपण कांही करूं शकणार नाहीं. पाण्याच्या जिवंत व वाहत्या प्रवाहामधेच भोवरे आढळून येतात. साचलेल्या व न वाहणाऱ्या पाण्यांत भोवरे कधीहि नसतात. जेव्हा धर्म मृतवत् होतात तेव्हा त्यांमधून नवे पंथ निघत नाहीत. स्मशानांतील शांतता व समता यांच्यासारखीच ती स्थिति होय. पण जोंपर्यंत मानव विचारशील आहे तोंपर्यंत अनेक धर्मपंथ निघाल्याशिवाय राहणार नाहीत. विविधता हें जिवंतपणाचें लक्षण आहे, आणि ती राहिलीच पाहिजे. माझी अशी प्रार्थना आहे की धर्मपंथ सारखे वाढत राहिले पाहिजेत, इतके की सरतेशेवटीं जितकीं माणसें तितके पंथ अशी स्थिति निर्माण व्हावी. आणि प्रत्येकाने आपापल्या पद्धतीप्रमाणे, आपापल्या विचारसरणीप्रमाणे धर्माच्या क्षेत्रांत विचार करावा.

पण अशी वस्तुस्थिति आधीपासूनच आहे. आपल्यापैकी प्रत्येकजण स्वतःच्या पद्धतीनेच विचार करीत आहे. पण या स्वाभाविक विचारपद्धतीच्या मार्गांत अनेक अडथळे निर्माण झालेले आहेत व होत आहेत. शस्त्राचा उपयोग जरी प्रत्यक्षपणें होत नसला, तरी इतर साधनांचे प्रयोग चालूंच आहेत. न्यूयॉर्क शहरांतील एक श्रेष्ठ धर्मोपदेशक काय म्हणतात तें पाहा : ते म्हणतात की फिलिपाइन प्रदेशांतील लोकांना तलवारीच्या जोरा-वरच जिंकलें पाहिजे, कारण त्यांना ख्रिस्ती धर्माचा उपदेश

देण्याचा तो एकच मार्ग उपलब्ध आहे ! आज ते लोक ख्रिस्ती धर्मातील कॅथॉलिक पंथाचे आहेत, पण या थोर धर्मोपदेशकांना त्यांना प्रेस्बिटेरियन पंथांत ओढावयाचें आहे. आणि यासाठी स्वतःच्या देशांतील लोकांना रक्तपाताच्या महापातकांत लोटण्याची त्यांची तयारी आहे. किती भयंकर गोष्ट आहे ही ! आणि हे गृहस्थ या देशांतील एक थोर धर्मोपदेशक आहेत, ते विद्वान आहेत, बहुश्रुत आहेत. अशा प्रकारचें मूर्तिमंत मूर्खपणाचें विधान जाहीरपणें करण्याची ज्यांना लाज वाटत नाही अशीं माणसें ज्या जगामधे उजळ माथ्याने वावरत आहेत त्या जगांतील स्थितीचा थोडासा तरी विचार करा ! आणि ज्या ठिकाणीं श्रोतृवृंद अशा माणसाचें कौतुक करतो त्या जगांतील स्थिति लक्षांत घ्या ! याला का सुधारणा असें म्हणावयाचें ? वाघाची, नरमांसभक्षक माणसाची, रानटी माणसाची ती जुनी रक्तपिपासु वृत्ति नवें नांव धारण करून नव्या जगांत अवतीर्ण झालेली आहे असा याचा अर्थ आहे. दुसरें काय ? आजच्या या सुधारलेल्या जगांतील ही स्थिति आहे, तर मग ज्या वेळीं प्रत्येक धर्मपंथ दुसऱ्या पंथाला नेस्तनाबूत करण्यासाठी आपल्या हातांतील सर्व साधनांचा वापर करण्याचा प्रयत्न करीत होता त्या जुन्या काळांत जगाला कोणत्या भयंकर यातनांमधून जावें लागलें असेल याचा आपण विचार करा. इतिहास याची साक्ष देत आहे. वाघाची रक्तपिपासु वृत्ति आमच्यामधे आहे; ती मेलेली नाही, तर ती फक्त झोपी गेलेली आहे. जेव्हा संधि मिळते तेव्हा ती एकदम उसळून वर येते आणि पूर्वीप्रमाणेच नखें सुळे बाहेर काढून चावा घेऊं लागते. तलवार वा इतर आधिभौतिक शस्त्रास्त्रें खेरीज करून, निंदा-नालस्ती, सामाजिक विद्वेष, बहिष्कार या-

सारखीं दुसरीं महाभयंकर हत्यारें या कामीं वापरलीं जातात. तंतोतंत आपल्याप्रमाणेच विचार न करणाऱ्या माणसांवर या भयंकर हत्यारांचे प्रहार करण्यांत येतात. आता प्रश्न असा आहे की, आपण जसा विचार करतों, अगदी तसाच विचार प्रत्येक माणसाने कां करावा ? मला तर याचें कांही कारण दिसत नाही. मी जर खरोखर विचारशील असेन तर माझ्याप्रमाणे इतर लोक विचार करीत नाहीत हें पाहून मला आनंद व्हायला पाहिजे. स्मशानशांतता असलेल्या जगांत राहण्याची मला इच्छा नाही. ज्या जगामधे 'माणसें' राहतात त्या जगामधे 'माणूस' म्हणून राहण्याची माझी इच्छा आहे. विचारशील व्यक्तींमधे मतवैचित्र्य हें असलेंच पाहिजे. मतांची विविधता हें विचाराचें प्रथम लक्षण आहे. मी जर खरोखरच विचारी मनुष्य असेन तर ज्या ठिकाणीं मतभेद आहे अशा विचारी माणसांच्या सहवासांत राहणें मला अधिक आवडल्याशिवाय राहणार नाही.

आता प्रश्न उपस्थित होतो तो असा की, ही सारी विविधता कशी सत्य असूं शकेल ? एक बाजू जर बरोबर असेल तर तिची विरोधी बाजू अर्थातच चूक असणार. परस्परविरोधी मतें एकाच वेळीं कशीं सत्य असणार ? आणि नेमक्या याच प्रश्नाचें उत्तर देण्याचें मीं या ठिकाणीं योजिलें आहे. पण तसें करण्यापूर्वी मला आपल्याला एक प्रश्न विचारावयाचा आहे. तो असा की, जगांतील सारे धर्म खरोखरच परस्परविरोधी आहेत काय ? थोर विचार ज्यांमधून प्रकट होतात तीं धर्मांचीं बाह्य अंगें मला या ठिकाणीं अभिप्रेत नाहीत. त्याचप्रमाणे निरनिराळ्या इमारती, भाषा, विधि-अनुष्ठानें, ग्रंथ आदि धर्मांचीं विविध अंगेंहि मला या ठिकाणीं अभिप्रेत नाहीत; तर प्रत्येक धर्माचा आत्मा, त्याचें

अंतरंगच मला या ठिकाणीं अभिप्रेत आहे. प्रत्येक धर्माच्या बाह्य स्वरूपामागे त्या धर्माचा आत्मा वास करीत असतो. आणि दुसऱ्या धर्माच्या आत्म्याहून हा निराळा असूं शकतो हेंहि खरें. पण म्हणून ते परस्परविरोधी ठरतात काय ? ते परस्परविरोधी आहेत की एकमेकांना पूरक आहेत हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. माझ्या लहानपणापासून हा प्रश्न मीं विचारासाठी घेतला, आणि आयुष्यभर मी त्या प्रश्नाचा अभ्यास करीत आहें. या प्रश्नाच्या बाबतींत माझा निष्कर्ष आपल्याला थोडासातरी उपयोगी पडेल असें वाटल्यामुळे मी तो आपल्यापुढें मांडतों. माझा असा विश्वास आहे की हे सर्व धर्म परस्परविरोधी नाहीत, तर ते एकमेकांना पूरक आहेत. जणुकांही प्रत्येक धर्म त्या महान् वैश्विक सत्याचा एक एक अंश स्वीकारतो आणि आपलें सारें सामर्थ्य त्या सत्यांशाला मूर्त रूप देण्यांत, त्याला साकार करण्यांत खर्च करतो. अशा रीतीने प्रत्येक धर्म एकेका अंशाची भरच घालीत असतो, सत्यांतून कांही वजा करीत नसतो. ही गोष्ट आपण जाणून घेतली पाहिजे. एकामागून एक दर्शनें निघतात. प्रत्येक दर्शनामधे एखादा मोठा विचार वा आदर्श सामावलेला असतो. हे सर्व आदर्श आपण एकत्र आणले पाहिजेत. याप्रमाणे मानवजातीची प्रगति होत जाते. मनुष्य हा असत्याकडून सत्याकडे जात नाही, तर तो सत्याकडून सत्याकडे जात असतो, खालच्या पातळीवरील सत्याकडून वरच्या पातळीवरील सत्याकडे तो जात असतो. परंतु असत्याकडून सत्याकडे तो कधीहि जात नसतो. पित्यापेक्षा मुलाचा विकास कदाचित् अधिक होऊं शकेल, पण याचा अर्थ पित्याला मुळीच बुद्धि नाही असा होत नाही. मुलामधे पिता तर असतोच, पण त्याच्यांत याहूनहि आणखी कांही अधिक

असतें, एवढेंच. तुमच्या लहानपणीं ज्ञानाची जी पातळी होती तिच्यापेक्षा आजची तुमची ज्ञानाची पातळी फार उच्च आहे हें खरें असलें तरी याचा असा अर्थ नव्हे की पूर्वीच्या त्या अवस्थेची तुम्हीं आता अवहेलना करावी. पूर्वीच्या त्या अवस्थेकडे पाहून ती अवस्था अगदी कुचकामाची होती असें तुम्ही म्हणाल काय ? आजची तुमची ज्ञानाची अवस्था ही तुमच्या लहानपणींच्या ज्ञानांत भर पडून तयार झालेली अवस्था होय.

आपल्याला ही सुद्धा गोष्ट माहीत आहे की एकाच गोष्टी-कडे पाहण्याचे जवळजवळ विरोधी असे दृष्टिकोन असूं शकतात, पण ते सर्व ती एकच गोष्ट व्यक्त करीत असतात. आपण अशी कल्पना करा की कोणी एक मनुष्य सूर्याकडे प्रवास करीत आहे. प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर तो सूर्याचा फोटो घेत आहे असें समजा. प्रवासाहून परत आल्यावर तो त्याच्या जवळचे सूर्याचे अनेक फोटो आपल्यासमोर ठेवतो. त्यांच्यापैकी कोणतेहि दोन फोटो सारखे नाहीत हें आपल्याला दिसतें. तथापि हे सर्व फोटो त्या एकाच सूर्याचे, पण निरनिराळ्या स्थानांहून घेतलेले आहेत हें कोणाला नाकारतां येईल ? निरनिराळ्या कोपऱ्यांतून या प्रार्थना-मंदिराचे चार फोटो घ्या आणि पाहा ते किती निरनिराळे दिसतात तें. असें असलें तरी ते सर्व याच प्रार्थनामंदिराचे फोटो आहेत हें उघड आहे. त्याचप्रमाणे सत्याकडे आपण विभिन्न दृष्टिकोनांतून पाहतों, आणि हे दृष्टिकोन आपला जन्म, आपलें शिक्षण, आपल्या आजूबाजूची परिस्थिति इत्यादींनुसार बदलत असतात. आपण पाहत असतों तें सत्यच, पण वरील प्रकारच्या परिस्थितीमधून आपल्याला तें जितकें दिसणें शक्य आहे तेवढेंच आपल्याला तें दिसत असतें; आपण तें आपल्या हृदयांतील

भावनेप्रमाणे रंगवीत असतों, आपल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणे तें समजून घेत असतों आणि आपल्या मनाच्या शक्तीप्रमाणे तें ग्रहण करीत असतों. सत्याचा आपल्याशीं जेवढा संबंध येतो, सत्याचा जेवढा अंश आपण ग्रहण करूं शकतों तेवढ्याचेंच आपल्याला ज्ञान होऊं शकतें. आणि यामुळेच माणसामाणसांत भेद असतो आणि यामुळेच कधीकधी परस्परविरोधी विचार निर्माण होतात. असें जरी असलें तरी आपण सर्वजण त्या एकाच महान् सार्वभौमिक सत्याशीं संबद्ध आहोंत हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे.

म्हणून मला असें वाटतें की हे सारे धर्म म्हणजे ईश्वराच्या सृष्टींतील निरनिराळ्या शक्ति असून त्या मानवाच्या हितासाठी कार्य करीत आहेत. त्यांच्यापैकी कोणतीहि शक्ति नष्ट होणार नाही किंवा नष्ट केली जाऊं शकणार नाही. ज्याप्रमाणे आपण निसर्गांतील कोणतीहि शक्ति नष्ट करूं शकत नाहीं त्याचप्रमाणे या आध्यात्मिक शक्तींपैकी कोणत्याहि शक्तीचा आपण नाश करूं शकणार नाहीं. आपण पाहिलेलेंच आहे की प्रत्येक धर्म जिवंत आहे. कधी त्याची प्रगति होत असते तर कधी त्याची पीछेहाट होत असते. एखाद्या वेळीं त्याचे पुष्कळसे अलंकार खाली उतरलेले असतील तर दुसऱ्या वेळेला तो नाना प्रकारच्या अलंकारांनी मढविलेला असेल. पण त्याच्या आंत त्याचा आत्मा सर्वदा विद्यमान असतोच, तो कधीहि नष्ट होत नाही. प्रत्येक धर्माचा जो आदर्श असतो तो कधीहि नष्ट होत नाही, आणि म्हणून प्रत्येक धर्म बुद्धिपुरःसर प्रगति करीत असतो.

आणि प्रत्येक देशांतील तत्त्वज्ञ व इतर विचारवंत यांना ज्या सार्वजनीन धर्माचीं स्वप्नें पडलेलीं आहेत तो आधीच अस्तित्वांत

आहे. तो विद्यमान आहेच. ज्याप्रमाणे विश्वबंधुत्वाची भावना आधीपासूनच जगांत अस्तित्वांत आहे, त्याचप्रमाणे सार्वजनीन धर्महि आधीपासून अस्तित्वांत आहे. आपणांपैकी ज्यांनी देशोदेशीं प्रवास केलेला आहे. त्यांना प्रत्येक देशांत बंधु-भगिनी आढळून आलेल्या नाहीत काय ? मला सर्व जगांत त्या आढळून आलेल्या आहेत. विश्वबंधुत्वाची भावना आधीपासूनच विद्यमान आहे, पण पुष्कळ लोकांना ती दिसत नाही आणि नव्या विश्वबंधुत्वाची मागणी करून हे लोक विश्वबंधुत्वाला धक्का पोहोचवितात. सार्वजनीन धर्मसुद्धा आधीच अस्तित्वांत आहे. निरनिराळ्या धर्मांचा उपदेश करण्याची सर्व जबाबदारी ज्यांनी आपल्या शिरावर घेतलेली आहे अशा धर्मगुरूंनी व इतर लोकांनी आपला धर्मप्रचार जर कांही काळ थांबविला तर सार्वजनीन धर्म आधीच अस्तित्वांत आहे असें आपल्याला दिसून येईल. हा सार्वजनीन धर्म व्यक्त होऊं नये म्हणून हे लोक नेहमी व्यत्यय आणीत असतात, कारण त्यांत त्यांचा स्वार्थ असतो. प्रत्येक देशांतील धर्मगुरूंचा वर्ग हा अतिशय सनातनी वृत्तीचा असतो असें आपल्याला आढळून येईल. हें असें कां आहे ? असे फारच थोडे धर्मगुरु आहेत की जे नेते बनून जनतेचें मार्गदर्शन करीत असतात. उलट बहुतेक धर्मगुरु जनतेच्या मतानेच चालत असतात आणि ते तिचे गुलाम व नोकर बनलेले असतात. जर तुम्ही म्हणालांत की एखादी वस्तु सुकी आहे तर ते 'हो' म्हणतील; 'काळी आहे' असें म्हणालांत तर ते 'काळी आहे' असें म्हणतील. जर जनतेमधे सुधारणा झाली तर धर्मगुरूंमधेहि सुधारणा होईलच. ते मागे राहूं शकणार नाहीत. म्हणून धर्मगुरूंना दोष देण्याऐवजी—आणि त्यांना दोष देणें ही तर आज

१२३२०

फॅशनच बनली आहे--आपण स्वत:लाच दोष दिला पाहिजे. ज्या गोष्टीसाठी आपली लायकी असते तीच गोष्ट आपल्याला मिळते. नव्या पुरोगामी विचारांचा प्रसार करून जनतेला पुढे नेण्याचा प्रयत्न जर एखाद्या धर्मगुरूने केला तर त्याची काय अवस्था होईल? त्याच्या मुलांची कदाचित् उपासमार होईल आणि त्याला फाटके कपडे घालून राहावें लागेल. या जगाचे जे नियम आपल्याला लागू आहेत तेच त्यालाहि लागू आहेत. तो म्हणतो की तुम्ही जर पुढे जाल तर मीहि तुमच्याबरोबर येईन. अर्थातच कांही महात्मे असे आहेत की सार्वजनिक मताला ते भीतीने मान तुकवीत नाहीत. सत्य काय हें त्यांना दिसत असतें व त्यालाच ते किंमत देतात. सत्याचा त्यांच्यावर पगडा बसलेला असतो, जणु कांही ते सत्याच्या स्वाधीन असतात, आणि म्हणून असे महात्मे प्रगति केल्याशिवाय राहत नाहीत. ते कधीहि मागे पाहत नाहीत आणि सामान्य लोकांवर अवलंबून राहत नाहीत. ते केवळ ईश्वराकडेच बघतात. ईश्वरच त्यांचा मार्गदर्शक प्रकाश आहे आणि ते याच प्रकाशाचें अनुसरण करीत असतात.

या देशांतील मॉर्मन पंथाच्या एका सद्गृहस्थाशीं माझी भेट झाली आणि त्यांनी मला आपल्या पंथाचा स्वीकार करण्याची गळ घातली. मी म्हणालों, "तुमच्या मतप्रणालीबद्दल मला अत्यंत आदर आहे. पण कांही बाबतींत आपलें जमणार नाही. मी संन्यासी आहें आणि तुम्ही 'अनेक बायका कराव्या' या मताचे आहांत. परंतु तुमच्या पंथाचा उपदेश करण्यासाठी तुम्ही भारतांत कां जात नाही?" मीं असा प्रश्न विचारल्यामुळे त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. ते म्हणाले, "आपला विवाहावर मुळीच विश्वास नाही, आणि आम्ही तर बहुपत्नीकत्व मानणारे

आहोंत. असें असूनहि आपण मला आपल्या देशाला भेट द्यायला सांगतां !" मी म्हणालों, "होय, माझे देशबांधव प्रत्येक धार्मिक विचार, मग तो कोणत्याहि देशांतील का असेना, ऐकून घेतील. आपण भारताला भेट दिलीत तर किती बरें होईल ? आपण असें करावें अशी माझी इच्छा आहे; कारण पहिली गोष्ट ही की अनेक धर्मपंथ असावेत असा माझा विश्वास आहे. दुसरी गोष्ट ही की, भारतामधे अशीं कितीतरी माणसें आहेत की त्यांचें सध्या अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि धर्मपंथाने समाधान होत नाही. या असमाधानी वृत्तीमुळे त्यांना धर्माशीं कांहीच कर्तव्य राहिलेलें नाही. आणि म्हणून कदाचित् त्यांच्यापैकी कांही-जण तुम्हांला अनुयायी म्हणून लाभतील." जितके धर्मपंथ अधिक तितकी लोकांना धर्म लाभण्याची शक्यता अधिक. ज्या उपहार-गृहामधे सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ उपलब्ध असतात त्या ठिकाणीं आपली भूक भागविण्याची संधि प्रत्येक माणसाला मिळत असते. म्हणून प्रत्येक देशामधे धर्मपंथांची वाढ व्हावी असें मला वाटतें. त्यामुळे स्वाभाविकच पुष्कळ माणसांना आध्यात्मिक जीवनाची संधि मिळेल. लोकांना धर्म आवडत नाही अशी समजूत करून घेऊं नका. माझा या समजुतीवर विश्वास नाही. लोकांना जें पाहिजे असतें तें धर्मगुरु त्यांना देऊं शकत नाहीत. ज्याला नास्तिक, जडवादी इत्यादि म्हटलें जातें अशा मनुष्याला त्याच्या पक्षीं आवश्यक असलेलें सत्य देणारा एखादा माणूस जर भेटला तर कदाचित् तोच मनुष्य समाजांत सर्वांत अधिक अध्यात्मसंपन्न अशी व्यक्ति बनेल. आपल्याला ज्या पद्धतीने जेवण्याची सवय असते त्याच पद्धतीने आपण जेवूं शकतों. उदाहरणार्थ, आम्ही हिंदु लोक आपल्या हाताच्या बोटांनी जेवतों. तुमच्यापेक्षा आमचीं बोटें

अधिक लवचिक आहेत. आमच्यासारखा त्यांचा उपयोग तुम्हांला करतां येईलच असें नाही. केवळ अन्न मिळून भागत नाहीं, तर तें प्रत्येकाने स्वतःच्या पद्धतीप्रमाणे खाल्लें पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्याला कांही आध्यात्मिक विचार केवळ मिळाल्यानेच भागत नाही, तर ते आपल्याला आपल्याच विशिष्ट पद्धतीने मिळावयास हवेत. आपल्या भाषेंत, आपल्या हृदयाच्या भाषेंत जर ते व्यक्त केले गेले तरच त्यांनी आपलें समाधान होईल. जेव्हा एखादा मनुष्य माझ्या स्वतःच्या भाषेंत बोलतो आणि माझ्याच भाषेंत सत्याचा उपदेश करतो तेव्हा मला तें सत्य तात्काळ समजतें, आणि मी तें कायमचें ग्रहण करतों. ही एक महत्त्वाची गोष्ट आहे.

यावरून आता आपल्याला असें आढळून येईल की मानवी मनाचे विभिन्न स्तर आणि विभिन्न प्रकार आहेत. अशा परिस्थितींत धर्म स्वतःवर किती मोठी जबाबदारी घेत असतात! कोणी एखादा मनुष्य दोन-तीन तत्त्वें पुढे मांडतो आणि अखिल मानवजातीचें समाधान करण्याचें सामर्थ्य आपल्या धर्ममतामधे आहे असा दावा करतो. तो आपल्या हातांत एक लहान पिंजरा घेऊन ईश्वराच्या शिकारखान्यांत -- या जगांत -- उभें राहून म्हणतो, "माझ्या या लहानशा पिंजऱ्यांत ईश्वराने, हत्तीने, प्रत्येकाने शिरलेंच पाहिजे. हत्ती जर शिरूं शकत नसेल तर त्याचें तुकडे तुकडे करून त्याला आंत शिरविलें पाहिजे." याचप्रमाणे आणखी एखादा धर्मपंथ असेल, त्यांत कांही सुंदर तत्त्वें असतील. त्या पंथाचे अनुयायी म्हणतील, "सर्वांनी या पंथामधे आलेंच पाहिजे!" "परंतु सर्वांसाठी तिथे जागा नाही" असें कुणी म्हटल्यास हे लोक म्हणतील, "कांही हरकत नाही! सर्वांचे तुकडे तुकडे करा. कसेंहि करून त्यांना आंत घ्या आणि जर ते

आंत आले नाहीत तर ते नरकांत जातील." आपलीं मतें लोक कां ऐकून घेत नाहीत याचा थोडा वेळ थांबून विचार करणारा एकहि धर्मोपदेशक वा धर्मपंथ अजून माझ्या पाहण्यांत आला नाही. उलट, लोकांना शिव्याशाप देऊन ते म्हणतात की लोक दुष्ट आहेत. "लोक माझे शब्द कां ऐकून घेत नाहीत ? सत्याचें दर्शन मी त्यांना कां घडवूं शकत नाहीं ? त्यांना समजेल अशा त्यांच्या भाषेंत मला कां बोलतां येऊं नये ? त्यांचे डोळे मला कां उघडतां येत नाहीत ?"--असे प्रश्न ते स्वत:ला कधीहि विचारीत नाहीत. वास्तविक पाहतां त्यांना हें सारें कळायला पाहिजे. आणि लोक आपलें ऐकून घेत नाहीत असें त्यांना जेव्हा दिसून येतें तेव्हा दुसऱ्याला दोष न देतां त्यांनी स्वत:लाच दोषी मानलें पाहिजे. पण ते नेहमीच असें समजतात की दोष लोकांचाच आहे ! प्रत्येकाला आपल्या पंथांत समाविष्ट करून घेतां येईल इतका व्यापक ते आपला पंथ कधीच बनवीत नाहीत.

म्हणून मनाचा हा जो कमालीचा संकुचितपणा आपल्याला आढळून येतो त्याचें कारण काय हें आपल्या चटकन् लक्षांत येतें. हें कारण म्हणजे अंश हा स्वत: पूर्ण असल्याचा दावा करतो, क्षुद्र समर्याद वस्तु स्वत: असीम, अनंत असल्याचा दावा करते. गेल्या कांही शतकांत मानवाच्या सदोष विचारसरणीमधून जन्माला आलेले हे लहानसहान धर्मपंथ अनंत ईश्वरी सत्याच्या संपूर्ण ज्ञानाचा अविवेकी अधिकार सांगूं लागतात याचा विचार करा ! किती हा त्यांचा अविवेकीपणा ! तो काय दर्शवितो ? मनुष्य किती अहंकारी झालेला आहे हेंच तो दर्शवितो. असे दावे सतत फसले असल्यास नवल नाही आणि ईश्वरी कृपेने ते सतत असेच फसल्याशिवाय राहणार नाहीत. या बाबतींत मुसलमान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३३८९५ वि: [illegible]
क्रमांक १४१८ नों दि: २८-११-६२

लोक सर्वांत पुढे गेले होते. धर्मप्रसाराचें प्रत्येक पाऊल त्यांनी शस्त्राच्या साहाय्याने टाकलें होतें. एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तलवार ! 'कुराण माना, किंवा मरणाला तयार व्हा ! दुसरा मार्गच नाही !' त्यांना किती कल्पनातीत यश लाभलें हें इतिहासावरून आपल्याला कळेल. सहाशे वर्षें कोणीहि त्यांचा प्रतिकार करूं शकला नाही. नंतर असा काळ आला की त्यांना आपलें कार्य थांबविणें भाग पडलें. इतर धर्मांनी जर त्याच मार्गाचा अवलंब केला तर त्यांचीहि तीच गत झाल्याशिवाय राहणार नाही. आपण जणु कांही तान्हीं बाळेंच आहोंत ! आपल्याला मानवी स्वभावाचा सतत विसर पडतो. आपण जेव्हा आयुष्याला सुरवात करतों तेव्हा आपल्याला असें वाटतें की आपलें नशीब म्हणजे कांहीतरी असामान्य आहे. आपली ही कल्पना कशानेहि दूर होत नाही. परंतु आपण जेव्हा वयाने मोठे होतों तेव्हा आपले विचार बदलतात. धर्मांच्या बाबतींतहि हेंच खरें आहे. सुरवातीच्या अवस्थेंत धर्माचा जेव्हा थोडाबहुत प्रसार होतो तेव्हा त्या धर्माच्या अनुयायांची अशी समजूत होते की आपण थोड्याच वर्षांत सर्व मानवजातीचें मतपरिवर्तन करूं शकूं, आणि अशा समजुतीने प्रेरित होऊन तो धर्म माणसांना ठार मारण्याचा, त्यांच्या कत्तली करण्याचा सपाटा चालूं ठेवतो व बळजबरीने त्यांना धर्मान्तर करायला लावतो. कांही दिवसांनंतर त्याला यश लाभत नाही आणि मग त्याला वस्तुस्थितीची अधिक चांगली कल्पना येऊं लागते. ज्या उद्देशाने या धर्मपंथांनी आपलें कार्य सुरू केलें होतें त्यांत त्यांना यश आलें नाही असें आपल्याला आढळून येतें. जगाच्या दृष्टीने हें फार चांगलें झालें. जर असा एखादा धर्मान्ध पंथ सर्व जगभर यशस्वी झाला असता तर

मानवाची आज काय अवस्था झाली असती याचा विचार करा. ते यशस्वी झाले नाहीत याबद्दल आपण परमेश्वराला धन्यवाद दिले पाहिजेत ! तरी पण प्रत्येक पंथ हा एकेका महान् सत्याचा आविष्कार आहे; प्रत्येक धर्म एखादा विशिष्ट महान् गुण व्यक्त करीत असतो आणि तोच त्याचा आत्मा असतो. या ठिकाणीं मला एका जुन्या गोष्टीची आठवण होते. कांही नरभक्षक राक्षसिणी होत्या. त्या माणसांना ठार मारीत आणि त्यांना नानाप्रकारें त्रास देत. पण त्यांना मात्र कुणी ठार मारूं शकत नसे. कांही दिवसांनंतर एका माणसाला कळलें की त्यांचे आत्मे दुसऱ्या कांही पक्ष्यांमधे राहतात, आणि जोंपर्यंत हे पक्षी सुरक्षित आहेत तोंपर्यंत या नरभक्षक राक्षसिणींना कोणीहि ठार करूं शकणार नाही. त्याचप्रमाणे आपला प्रत्येकाचा जणुकांही एकेक पक्षी असून त्यामधे आपला आत्मा राहतो; आपल्यापैकी प्रत्येकाचा एकेक आदर्श असतो आणि प्रत्येकाला आपल्या जीवनांत कोणतें ना कोणतें कार्य करावयाचें असतें. प्रत्येक मनुष्य हा अशा आदर्शाचें, अशा जीवनकार्याचें मूर्तिमंत स्वरूपच होय. आपण जरी दुसरें कांही गमावलें तरी जोंपर्यंत आपला आदर्श कायम आहे, जोंपर्यंत आपल्या जीवितकार्याला धक्का पोहोचलेला नाही, तोंपर्यंत आपल्याला कोणीहि नष्ट करूं शकणार नाही. संपत्ति मिळेल किंवा जाईल, विपत्तींचे उंच उंच डोंगर पुढे उभे राहतील, परंतु आपला आदर्श जर अढळ असेल तर आपला नाश कोणीहि करूं शकणार नाही. तुम्ही कदाचित् वृद्ध असाल, तुम्ही कदाचित् शंभर वर्षांचे सुद्धा असाल, परंतु जर अंगीकृत जीवनकार्याची जाणीव तुमच्या अंतःकरणामधे सतत ताजीतवानी असेल तर तुम्हांला कोण ठार मारूं शकणार ? परंतु जेव्हा तुम्ही तो

आदर्श गमावतां आणि जेव्हा तुमच्या जीवितकार्याला धक्का पोहोचतो तेव्हा तुमचें रक्षण कोणीच करूं शकत नाही. जगांतील सारी संपत्ति किंवा सत्ता तुमचें संरक्षण करूं शकणार नाही. आणि राष्ट्रें म्हणजे तरी दुसरें काय ? अनेक व्यक्तींचे समूह म्हणजेच राष्ट्रें. राष्ट्राराष्ट्रांमधे सुसंवाद राहण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने आपला वांटा उचलला पाहिजे--आपापलें जीवितकार्य पार पाडलें पाहिजे. आणि जोंपर्यंत कोणतेंहि राष्ट्र आपल्या आदर्शाला चिकटून राहतें तोंपर्यंत त्याचा कोणीच नाश करूं शकत नाही. उलट जर तें राष्ट्र आपलें जीवितकार्य सोडून देऊन भलत्याच गोष्टीच्या मागे लागलें तर त्या राष्ट्राचे दिवस लवकरच भरतात व तें नाश पावतें.

आणि हीच गोष्ट सर्व धर्मांना लागू आहे. हे सारे जुने धर्म अजून टिकून आहेत यावरून हें सिद्ध होतें की त्यांनी आपलें जीवितकार्य अजून सोडलें नाही. या धर्मांकडून अनेक चुका घडल्या, त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें, त्यांच्यांत अनेक भांडणें झालीं, त्यांच्यावर बाह्य विधींचीं व अनुष्ठानांचीं अनेक पुटें चढलीं, तरी त्यांचें हृदय अजूनहि शाबूत आहे, तें जिवंत आहे, अजूनहि धडधडत आहे. ज्या थोर जीवितकार्यासाठी या धर्मांची उत्पत्ति झाली तें त्यांच्यापैकी कुणींहि टाकलें नाही. तें जीवितकार्य समजावून घेणें ही एक स्पृहणीय गोष्ट आहे. इस्लाम धर्माचेंच उदाहरण घ्या. ख्रिस्ती लोक सर्वांत जास्त द्वेष जर कोणत्या धर्माचा करीत असतील तर तो इस्लाम धर्माचाच. त्यांच्या मतें जगांत आतापर्यंत होऊन गेलेल्या धर्मांमधे तोच सर्वांत निकृष्ट प्रतीचा धर्म आहे. एखाद्या माणसाने इस्लाम धर्माचा स्वीकार करतांच सर्व मुसलमान लोक कोणताहि भेदभाव

न ठेवतां त्याला बंधु मानून आलिंगन देतात. दुसरा कोणताहि धर्म तसें करीत नाही. तुमच्या अमेरिकेंतील रेड इंडियन लोकांपैकी जर एखाद्याने इस्लाम धर्म स्वीकारला तर तुर्कस्थानच्या सुलतानाला त्याच्यावरोबर अन्नग्रहण करण्यांत कांहीच हरकत वाटणार नाही. जर तो बुद्धिमान असेल तर कोणतीहि मानाची जागा त्याला सहज मिळूं शकेल. या अमेरिकेंत मला अजून असें एकहि चर्च वा प्रार्थनामंदिर आढळून आलेलें नाही की ज्या ठिकाणीं श्वेतवर्णी माणसाबरोबर कृष्णवर्णी निग्रो प्रार्थना करूं शकतो. या गोष्टीचा विचार करून पाहा. इस्लाम धर्म आपल्या सर्व अनुयायांना समान मानतो आणि हेंच इस्लाम धर्माचें सर्वोत्कृष्ट असें वैशिष्टच आहे. कुराण ग्रंथांत अनेक ठिकाणीं जीवनांतील वैषयिक सुखाच्या कल्पना आढळतात, आढळोत, परंतु इस्लाम धर्माची जर जगाला कोणती शिकवण असेल तर ती ही की त्या धर्माचे सर्व अनुयायी प्रत्यक्ष बंधुभावनेने जोडलेले आहेत. इस्लाम धर्माचें तेंच सारभूत तत्त्व आहे. या धर्मांतील स्वर्ग, जीवन इत्यादींविषयीच्या ज्या अन्य कल्पना आहेत त्या म्हणजे इस्लाम धर्म नव्हत--त्या सर्व बाहेरून आलेल्या कल्पना आहेत.

हिंदु लोकांसंबंधी आपण विचार कराल तर आपणांस असें आढळून येईल की आध्यात्मिकता हाच त्यांचा राष्ट्रीय आदर्श आहे. ईश्वरी स्वरूपाविषयी विचार करण्यांत हिंदु धर्माने जेवढी शक्ति खर्च केलेली आहे तेवढी जगांतील दुसऱ्या कोणत्याहि धर्माने वा धार्मिक ग्रंथाने खर्च केलेली दिसत नाही. हिंदु धर्माने आत्म्याच्या स्वरूपाची अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला की ज्या योगें कोणत्याहि प्रकारच्या पार्थिवतेच्या स्पर्शाने त्याचें स्वरूप कलंकित होऊं नये. आत्मा हा दिव्य स्वरूपाचा आहे. या दृष्टीने त्याच्यावर

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३३८१५ वि: ७.४.६४
क्रमांक १४१८ नों दि: १४-११-६५



मानवत्वाचा आरोप करणें उचित नाही. एकत्व, सर्वव्यापी ईश्वराचा साक्षात्कार यांचीच शिकवण हिंदु धर्मांत सर्वत्र दिलेली आढळते. ईश्वर स्वर्गामधे आहे यासारख्या कल्पना खुळचट होत अशी हिंदूंची विचारसरणी आहे. अशा कल्पना म्हणजे मनुष्याने ईश्वरावर मानवी गुणधर्मांचा केलेला आरोपच होय. स्वर्ग म्हणून जो कांही आहे तो या इथे आणि वर्तमान कालांतच आहे. अनंत कालांतील प्रत्येक क्षण सारखाच असतो. आपला जर परमेश्वरावर विश्वास असेल, तर या क्षणींहि आपल्याला त्याचें दर्शन होऊं शकतें. जेव्हा माणसाला कांही प्रत्यक्षानुभूति होते तेव्हाच त्याच्यापक्षीं धर्माची सुरवात होते असें आम्ही हिंदु लोक मानतों. कांही सिद्धान्तांवर विश्वास ठेवणें, त्यांना बौद्धिक संमति देणें, त्या सिद्धान्तांनाच आपलें धर्ममत म्हणून जाहीर करणें म्हणजे कांही धर्म नव्हे. ईश्वर आहे अशी आपली समजूत असेल, तर आपण त्याला पाहिलें आहे काय ? आपण जर या प्रश्नाचें उत्तर नकारार्थी दिलें तर ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? ईश्वर आहे की नाही अशी जर तुम्हांला शंका असेल, तर त्याला प्रत्यक्ष पाहण्यासाठी तुम्ही प्रत्यन कां करीत नाही ? जगाचा त्याग करून या एका ध्येयासाठी तुम्ही आपलें सर्व आयुष्य कां खर्च करीत नाही ? त्याग आणि आध्यात्मिकता हेच भारताचे दोन महान् आदर्श आहेत. आणि भारत या दोन आदर्शांना चिकटून राहिल्यामुळे त्याच्या सर्व प्रमादांना विशेष महत्त्व नाही.

ख्रिस्ती धर्माकडे पाहिलें तर आपल्याला असें आढळतें की त्याच्या शिकवणींतील मध्यवर्ती कल्पना ही आहे : 'सावध राहा, प्रार्थना करा, कारण ईश्वराचें राज्य अगदी जवळच आहे.

याचा अर्थ हाच की आपलें चित्त शुद्ध करा आणि ईश्वराच्या आगमनासाठी तयार राहा. ख्रिस्ती धर्मांतील हा भाव कधीहि नष्ट झालेला नाही. आपल्याला स्मरण असेल की अत्यंत कठीण परिस्थितींत आणि अत्यंत भोळसट समजुतींनी भरलेल्या ख्रिस्ती देशांतसुद्धा, इतरांना साहाय्य करणें, रुग्णालयें बांधणें इत्यादि कार्यांच्या द्वारें ख्रिस्ती लोक ईश्वराच्या आगमनासाठी तयार राहण्याचा प्रयत्न करीत असतात. जोंपर्यंत ख्रिस्ती लोक या आदर्शाला चिकटून राहतील तोंपर्यंत त्यांचा धर्म जिवंत राहील.

आता एक उदात्त कल्पना माझ्या मनांत आलेली आहे तें कदाचित् केवळ एक स्वप्न असेल. या जगांत तें कधी प्रत्यक्षांत येईल किंवा नाही हें मला माहीत नाही. कठोर वास्तविकतेंत राहून मरण्यापेक्षा असलें स्वप्नरंजन कधी कधी फार चांगलें असतें. महान् सत्यें, मग तीं स्वप्नांतलीं जरी असलीं, तरी तीं चांगलीं असतात; वाईट वस्तुस्थितीपेक्षा तीं निश्चितच अधिक चांगलीं असतात. म्हणून आपण थोडा वेळ स्वप्नसृष्टींत रमूं या.

आपल्याला माहीतच आहे की मनाचे विविध स्तर आहेत. तुम्ही कदाचित् वस्तुनिष्ठ बुद्धिवादी असाल; विधि-अनुष्ठानें इत्यादींची तुम्ही पर्वा करीत नसाल; बुद्धीला पटतील अशा प्रत्यक्ष गोष्टी तुम्हांला हव्या असतील आणि त्यांनीच तुमचें समाधान होत असेल. दुसरीकडे प्युरिटन आणि इस्लाम धर्माचे लोक आहेत. ते आपल्या उपासनागृहांत किंवा मशिदींत एकहि चित्र वा पुतळा ठेवूं देणार नाहीत. फार चांगली गोष्ट आहे. त्याला कांही हरकत नाही ! परंतु अधिक कलाप्रिय असा दुसरा एक मनुष्य आहे. त्याला रेखा, रंग, फुलें, आकृति अशीं कलेचीं अनेक अंगें आवडतात. त्याला ईश्वरोपासनेसाठी मेणबत्त्या, धूप,

दीप इत्यादि पूजासाहित्य लागतें. ज्याप्रमाणे तुम्ही बुद्धीच्या द्वारें ईश्वराला समजून घेऊं शकतां त्याचप्रमाणे तो या सर्व अनुष्ठानांच्या द्वारें ईश्वराला समजून घेत असतो. तसेंच आणखी एका प्रकारचे लोक असतात. ते म्हणजे भक्त. त्यांचा प्राण ईश्वराच्या दर्शनासाठी व्याकुळ होतो. ईश्वराची पूजा करणें, त्याचीं स्तोत्रें गाणें याव्यतिरिक्त त्यांना दुसरें कांही सुचत नाही. तसेंच, लोकांचा आणखी एक प्रकार असतो. तो म्हणजे तत्त्वज्ञांचा. ते या सर्व गोष्टींच्या बाहेर राहून त्या गोष्टींना हसतात. ते मनांत म्हणतात, "काय हा मूर्खपणा ! किती मूर्ख लोक आहेत हे ! ईश्वराविषयी त्यांच्या समजुती किती खुळचा आहेत !"

हे सारे एकमेकांना हसतात खरे, पण त्यांच्यापैकी प्रत्येकाला या जगांत स्थान आहे. ही मनाची विविधता, व्यक्तींचे हे विविध प्रकार आवश्यक आहेत. जर एखादा आदर्श धर्म निर्माण होणें शक्य असेल तर तो इतका व्यापक आणि विशाल असायला पाहिजे की या विविध प्रकारच्या सर्व मतांना त्याने खाद्य पुरविलें पाहिजे. तत्त्वज्ञाला तत्त्वज्ञानाचें सामर्थ्य, उपासकाला भक्ताचें हृदय, कर्मठाला सर्वोत्कृष्ट प्रतिमा-प्रतीकांमधून व्यक्त होणाऱ्या भावभावना आणि कवीला अत्यंत संवेदनाशील अंतःकरण, आणि याशिवाय इतर अनेक गोष्टी या आदर्श धर्माने दिल्या पाहिजेत. अशा प्रकारचा विशाल धर्म निर्माण करण्यासाठी, जेव्हा धर्म प्रथम अस्तित्वांत आले त्या कालापासून तों आतापर्यंतचे सर्व धर्म आपण सत्य म्हणून स्वीकारले पाहिजेत.

वगळणें नव्हे, तर ग्रहण करणें हें आपलें ध्येयवाक्य असायला पाहिजे. याचा अर्थ केवळ परधर्मसहिष्णुता असा नव्हे, कारण अनेकदा ही सहिष्णुता म्हणजे एकप्रकारची ईश्वर-

निंदाच असते. आणि तिच्यावर माझा विश्वास नाही. सर्व धर्म ग्रहण करण्यावर माझा विश्वास आहे. मी परधर्मसहिष्णु कां व्हावें? परधर्मसहिष्णुता याचा अर्थ असा की, तुम्ही चुकत आहां असें मला वाटतें, तरी पण मी तुमच्यावर कृपा करून तुम्हांला जगूं देतों. तुम्ही आणि मी इतरांवर कृपा करून त्यांना जगूं देत आहोंत असें समजणें ही ईश्वरनिंदाच नव्हे काय? सर्व प्राचीन धर्म मी सत्य मानतों, आणि त्या सर्वांबरोबर मी उपासना करतों. प्रत्येक धर्म ज्या रूपांत ईश्वराची उपासना करतो, त्या त्या रूपांत मी त्यांच्याबरोबर ईश्वराची उपासना करीन. मुसलमानांच्या मशिदीमधे मी जाईन; ख्रिस्ती लोकांच्या चर्च-मधे जाऊन तेथील क्रुसापुढे गुडघे टेकून मी प्रार्थना करीन; बुद्धमंदिरामधे प्रवेश करून भगवान बुद्ध व त्यांचा धर्म यांना मी शरण जाईन, आणि ज्या ज्ञानप्रकाशाने सर्वांचें हृदय उजळून निघतें त्याच्या अनुभूतीच्या प्रयत्नांत ध्यानमग्न झालेल्या हिंदु माणसाबरोबर वनांत जाऊन मी ध्यान करीत बसेन.

या साऱ्या गोष्टी मी करीनच, इतकेंच नव्हे, तर भविष्य-कालीं जे नवे धर्म उदयाला येतील त्यांना माझ्या हृदयांत प्रवेश मिळावा म्हणून मी तें सतत उघडें ठेवीन. ईश्वराचा ग्रंथ समाप्त झाला आहे काय? की तो अजूनहि क्रमाक्रमाने प्रकाशित होत आहे? जगांतील विभिन्न आध्यात्मिक अनुभूतींचा हा महान् ग्रंथ मोठा आश्चर्यकारक आहे. बायबल, वेद, कुराण आणि इतर सर्व पवित्र ग्रंथ हे त्याचीं पानें आहेत. आणि अद्याप त्याचीं असंख्य पानें प्रकाशित व्हावयाचीं आहेत. या सर्वांसाठी मी आपलें हृदय खुलें ठेवीन. आज जरी आम्ही वर्तमानकाळांत वावरत असलों तरी अनंत भविष्यकाळांत जें ज्ञान प्रकट होईल तें ग्रहण

करण्यासाठी आम्ही तयार आहोंत. भूतकाळांतील या सर्व गोष्टींचा आम्ही स्वीकार करतों, वर्तमानकाळांतील ज्ञानाचा आनंद आम्ही उपभोगतों आणि भविष्यकाळांत प्रकट होणाऱ्या सर्व गोष्टींना प्रवेश देण्यासाठी आम्ही आपल्या हृदयाचीं सर्व कपाटें उघडून ठेवतों. भूतकाळांतील सर्व प्रेषितांना, आजच्या सर्व थोर महात्म्यांना आणि भविष्यकालीन सर्व थोर विभूतींना प्रणाम असो !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. पुस्तक.
अनुक्रम 33295 वि. निविध
क्रमांक 1810 नों. दि. 14.11.62.

# आमचें अन्य प्रकाशन

## मराठी विभाग

| | | |
|---|---|---|
| १-२. | श्रीरामकृष्ण-चरित्र—प्रथम भाग (चवथी आवृत्ति) | रु.न.पै. |
| | पृ. सं. ३५४+३० | ४.२५ |
| | द्वितीय भाग (दुसरी आवृत्ति) पृ. सं. ३४२+१२ | ४.३७ |
| ३. | श्रीरामकृष्ण-वचनामृत -- (अंतरंग शिष्यांशीं व भक्तांशीं झालेलीं भगवान श्रीरामकृष्णांचीं संभाषणें) | |
| | प्रथम भाग (द्वितीय आवृत्ति) पृ. सं. ५८१ | ५ ५० |
| ४ | विवेकानंद-चरित्र — श्री. सत्येंद्रनाथ मुजुमदारकृत | |
| | पृ. सं. ५७३+१८ | ५.२५ |
| ५. | स्वामी विवेकानंदांची पत्रें --पृ. सं. ३३५ | ४.७५ |
| ६. | स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत — संकलक — | |
| | श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती -- पृ. सं. ३९६ | ४.५० |
| ७. | ज्ञानयोग --स्वामी विवेकानंद | ४.०० |
| ८. | राजयोग --स्वामी विवेकानंद | ३.०० |
| ९. | दैवी वाणी -- स्वामी विवेकानंद | २.७५ |
| १० | भारतीय नारी -- स्वामी विवेकानंद | २.०० |
| ११. | वेदान्तांचें स्वरूप आणि प्रभाव --स्वामी विवेकानंद | १.७५ |
| १२. | महापुरुषांच्या जीवनकथा -- (सातवी आवृत्ति) -- | |
| | स्वामी विवेकानंद | १.६२ |
| १३. | कर्मयोग -- (दुसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद | १.६२ |
| १४. | स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | १.६० |
| १५. | भक्तियोग -- स्वामी विवेकानंद | १.२५ |
| १६. | वेदान्त आणि जीवन — स्वामी विवेकानंद | १.२५ |

| | | |
|---|---|---|
| १७. | पूव आणि पश्चिम — स्वामी विवेकानंद | १.२५ |
| १८. | विवेकानंद-वाणी — (तिसरी आवृत्ति) | ०.९० |
| १९ | माझें जीवन आणि कार्य -- स्वामी विवेकानंद | ०.६५ |
| २०. | माझे गुरुदेव -- (तिसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद | ०.६२ |
| २१. | शिकागो व्याख्यानें -- (तिसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद | ०.६२ |
| २२. | पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व--स्वामी विवेकानंद | ०.६० |
| २३. | हिंदुधर्माचें नव-जागरण -- (दुसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद | ०.५६ |
| २४. | शिक्षण -- (दुसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद | ०.५६ |
| २५. | पवहारी बाबा -- (दुसरी आवृत्ति) — स्वामी विवेकानंद | ०.५० |
| २६. | हिमालयाच्या कुशींत -- स्वामी अखंडानंद | २.५० |
| २७. | रामकृष्ण-संघ -- ध्येय व इतिहास -- स्वामी तेजसानंद | ०.७५ |
| २८ | स्वामी विवेकानंदांच्या आठवणी | १.२५ |
| २९. | श्रीरामकृष्ण-वाक्सुधा -- (चवथी आवृत्ति) -- (भगवान श्रीरामकृष्णांच्या निवडक उपदेशांचें त्यांच्याच एका अंतरंग शिष्याने केलेलें संकलन) | ०.६२ |
| ३०. | साधु नागमहाशय-चरित्र -- (भगवान श्रीरामकृष्णांचे सुप्रसिद्ध शिष्य) -- (दुसरी आवृत्ति) -- -- अनु. श्री. बा. सोमण | २.०० |

याशिवाय आमच्या आश्रमाने हिंदी भाषेंतूनहि समग्र रामकृष्ण-विवेकानंद साहित्य प्रकाशित केलें आहे. त्यासाठी विस्तृत सूचीपत्र मागवावें.

९२३२०

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर – १.**

REFBK-0012320